# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०१५ / फाल्गुन २५, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त आणि नियोजन, वने मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १०७**

---

**विदर्भातील सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(१) * ३०२८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.राजेंद्र मुळक, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४८९४८ ला दिनांक ५ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील सिंचन प्रकल्पांच्या कामासाठी मागणीनुसार निधी उपलब्ध झाला नसल्याने आजमितीस २ लाख ४७ हजार हेक्टर सिंचन अनुशेष कायम असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संकटे कायम असताना विदर्भ सिंचन महामंडळाकडे दोन हजार कोटी रूपयांचा निधी पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील काही सिंचन प्रकल्पाचे बांधकाम ७५ टक्क्यांपर्यंत पूर्ण असून या सिंचन प्रकल्पास वाढीव निधी देवून ते पूर्ण करण्यात येणार आहेत व ज्या सिंचन प्रकल्पाचे बांधकाम दहा टक्क्यापर्यंत करण्यात आले आहे अशा सिंचन प्रकल्पासाठी वाढीव निधी देण्यात येणार नसून ते पूर्ण करण्यात येणार नसल्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील सिंचन प्रकल्पांची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत व महामंडळाकडे पडून असलेला निधी सिंचन विकासासाठी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालानुसार निर्देशांक व अनुशेष समितीच्या अनुशेषापैकी जून २०१२ अखेर २२७.७५ हजार हेक्टर रबी समतुल्य इतका अनुशेष अमरावती प्रदेशातील ३ जिल्ह्यांमध्ये शिल्लक आहे. तथापि मागणीनुसार निधी उपलब्ध झाला नाही ही एकच कारण नसून भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन इ. कारणांमुळे अनुशेषाचे निर्मुलन होवू शकलेले नाही.
(२) होय.
(३) अनुशेषांतर्गत प्रकल्प तसेच ७५ % पेक्षा जास्त गुंतवणूक झालेल्या प्रकल्पावर निधी केंद्रीत करुन प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले आहे.
(४) भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन, स्थानिक शेतक-यांचा विरोध यासह प्रकल्पावरील अडचणी दूर करुन प्रकल्प कामांना गती देण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लघुपाटबंधारे योजना काचुर्ली (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) या प्रकल्पाच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२) * ३४६१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ११७१ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लघुपाटबंधारे योजना काचुर्ली (ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक) या प्रकल्पाच्या कामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याची तक्रार जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामाची महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था तसेच दक्षता व गुणनियंत्रक विभागाकडून तपासणी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,
(२) होय,

(३) व (४) नाही. दक्षता पथक ठाणे मार्फत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत त्यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार चौकशी सुरु आहे.

-----------------

**राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व जिल्हा रुग्णालयातील डाटा एंट्री ऑपरेटर कम अकाऊंटंट यांना थकित वेतन अदा करण्याबाबत**

**(३) * २६५३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विभागामार्फत राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालयात डाटा ऐंट्री ऑपरेटर कम अकाउंटट या पदाच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डाटा एंट्री ऑपरेटर कम अकाउंटंट यांच्या नेमणूका ईगल सेक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस, मुंबई या कंपनी मार्फत करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने या डाटा एंट्री ऑपरेटर कम अकाउंटंट यांना माहे मार्च २०१४ पासून वेतन दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नऊ महिन्यांपासून थकित वेतन मिळावे व ते वेतन न देणाऱ्या कंपनीविरुद्ध कारवाई करण्याच्या मागणीसाठी अखिल भारतीय एडीईओ संघटना परिसंघाने मुंबईच्या आझाद मैदानावर दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीनुसार या डाटा एंट्री ऑपरेटर कम अकाऊंटंट यांना थकित वेतन देऊन शासनाने कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आवश्यक असलेल्या डेटा एंन्ट्री ऑपरेटर कम अकाउटंट या कंत्राटी तत्वावरील पदांच्या सेवा पुरविण्यासाठी मे. ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्विसेस यांना शासनाने निविदेच्या माध्यमातून कंत्राट दिले असून सदर कंपनीमार्फत राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत डाटा एंन्ट्री ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) अंशतः खरे आहे.

सदर कंपनीने काही अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना माहे एप्रिल २०१४ पर्यंतचे वेतन अदा केले असल्याचे कळविले आहे. तसेच सदर कंपनीने अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना मे, २०१४ पासून वेतन अदा केलेले नाही.

(४) हे खरे आहे.

(५) आखिल भारतीय एडीईओ संघटना परिसंघ व मे. ईगल सिक्यरिटी ॲण्ड पर्सनल सर्विसेस, मुंबई यांच्या सोबत दि. ३१/१/२०१५ रोजी आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती बैठकीमध्ये मे. ईगल सिक्यरिटी ॲण्ड पर्सनल सर्विसेस, मुंबई यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत मिळालेल्या हजेरी पत्रकामध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी असल्याचे नमूद केले. यासाठी जिल्हा स्तरावर समिती गठीत करुन सुधारीत हजेरी पत्रक लवकरात लवकर राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्षाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जिल्हा स्तरावर समिती गठीत करुन माहे फेब्रुवारी, २०१४ ते जानेवारी, २०१५ या कालावधीतील हजेरी पडताळणी करण्याचे काम पुर्ण झाले आहे. त्यानुसार आता या कर्मचाऱ्यांना थेट वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्याचे विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मु.पो. कट्टा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील समादेवी मंदिर ते गोकुळ आळी या रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत**

**(४) * ३५५५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. कट्टा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील समादेवी मंदिर ते गोकुळ आळी तसेच नांदोस येथील रस्त्यांच्या रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरणाचे काम अद्याप करण्यात आले नसल्याने सदर भागातून ये-जा करणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतीकडे निधी असतांना सुध्दा वरील भागातील रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण व खडीकरण करण्यास ग्रामपंचायत दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच मु.पो. कट्टा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील समादेवी मंदिर ते गोकुळ आळी तसेच नांदोस येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत पिण्याचे पाणी व रस्त्यावरील पथदिवे याची सोय नसल्याने तेथील ग्रामस्थांमध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण झालेले आहे, ही ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदर कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

समादेवी मंदिर ते गोकुळ आळी तसेच नांदोस येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. रस्त्यावरील सौरपथदिवे व स्ट्रीट लाईट बसविण्यात आले असून चालू स्थितीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सदर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या दृष्टीने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बांबु व्यवसायाला प्रोत्साहन देण्याबाबत**

**(५) * २६८८ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक २१०९ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बांबू व्यवसायाला प्रोत्साहन देण्याकरिता शासनाचे धोरण काय आहे,

(२) असल्यास, आतापर्यंत त्यानुसार शासनाने कोणत्या सवलती व्यावसायिकांना दिल्या आहेत,

(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, धोरण न ठरविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) बांबू व्यवसायाला प्रोत्साहन देण्याकरिता ४ डिसेंबर, २०१४ रोजी नवीन बांबू धोरण जाहीर करण्यात आले असून, त्यात १) खाजगी जमिनीवर बांबू लागवडीस प्रोत्साहन देणे. २) खाजगी जमिनीवरील बांबूस वाहतूक पासाच्या बंधनातून मुक्त करणे. ३) बांबू क्षेत्रातील उद्योजकांना ई-लिलाव पध्दतीने पारदर्शकरीत्या बांबू पुरवठा करणे. ४) बुरुड कामगारांना वन विभागाकडे नोंदणी करुन त्यांना स्वामित्व शुल्क (Royalty) तसेच वनविकास कर न आकारता बांबू पुरवठा करणे. ५) शास्त्रोक्त पध्दतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण व प्रसार करण्यासाठी प्रशिक्षण केंद्राची स्थापना करणे. ६) ज्या गावाजवळच्या वनक्षेत्रात स्थानिक लोकांना संयुक्त वनव्यवस्थापन समिती व ग्रामवन समिती मार्फत बांबूचा निष्कासन व जतन करणे याचा समावेश आहे.

शासनाने आतापर्यंत याबाबत घेण्यात आलेले निर्णय खालील प्रमाणे आहे.

* शासन निर्णय दिनांक २१/०२/२०१४ अन्वये ई-लिलाव द्वारे बांबू उद्योजकांना बांबू पुरवठाचा निर्णय घेण्यात आला.
* दिनांक २४/६/२०१३ च्या अधिसूचनान्वये खाजगी क्षेत्रातील Dendrocalamus strictus व Bambusa bambos या दोन प्रजाती व्यतिरिक्त इतर सर्व प्रजातीना वाहतूक परवाना पासून मुक्त करण्यात आले.

* दिनांक ३०/१०/२०१४ च्या अधिसूचने अन्वये बुरडांना बांबूवरील वनविकास करातून
* सूट देण्यात आली व त्यांनतर ५/१२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये बुरडांना स्वामित्व शुल्कातून सूट देण्यात आली व तसेच ज्या बुरडांची नोंदणी करण्यात आली नाही, त्यांची नोंदणी करण्यास मान्यता देण्यात आली.
* दिनांक ४/१२/२०१४ च्या शासन निर्णयानुसार जाहिर करण्यात आलेल्या नवीन बांबू
* धोरणाची अंमलबजावणी करिता चिचपल्ली, जिल्हा चंद्रपूर येथे संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा प्रकल्पाच्या सुधारीत प्रस्तावाला मंजुरी मिळणेबाबत**

**(६) * ४०५४ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा प्रकल्पाचे काम मागील २ वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे सदर कामे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शासकीय मान्यतेला मंजूरी मिळाल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम लवकर सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे, तथापि सन २०१३-१४ या आर्थीक वर्षात वितरीत झालेल्या तरतुदीच्या मर्यादेत खर्च करण्याची १७.३८ कोटी खर्च करण्यास परवानगी प्रदान केली असल्यामुळे प्रकल्पाचे काम ऑक्टोबर २०१४ पासून पुन्हा सुरु करण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्तावाबाबत छाननी सुरु आहे.

(४) सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गेवराई (जि.बीड) येथील ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करण्याबाबत**

**(७) * ३६७१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) विधानसभा मतदार संघातील ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करणेबाबत लोकप्रतिनिधींनी यांनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भौगोलिक आणि प्रशासकीय अडचणी लक्षात घेऊन ग्रुप ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करण्याची मागणी संबंधीत ग्रामस्थांनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित गावांच्या विकासासाठी शासन विशेष बाब म्हणून या ग्रामपंचायतींच्या विभक्तीकरणास मान्यता देणार आहे काय,

(४) ग्रामपंचायतीच्या विभक्तीकरणासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

(३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दि. १८.११.२०१४ च्या व दिनांक ०२ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये संबंधित गट विकास अधिका-यांकडून ग्रामपंचायतीच्या विभक्तीकरणाबाबतचे प्रस्ताव मागविले आहेत.

सदरहू ग्रामपंचायतीच्या विभक्तीकरणाचे प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागात डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(८) * ३६८२ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण : ता.प्र.क्र. ११२४ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी गट अ व ब श्रेणीची ११०४ पदे तसेच डॉक्टरांसह तीस टक्के पदे रिक्त असल्याने राज्यातील रुग्णांना पुरेशा प्रमाणात औषधोपचार मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची पदे पूर्णक्षमतेने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वर्ग-१) संवर्गाची १४८९ पदे मंजूर असून त्यापैकी ६४५ पदे भरलेली व ८४४ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोगय सेवा गट-अ वैद्यकीय अधिकारी संवर्गाची ७१७६ पदे मंजूर असून त्यापैकी ६२०२ पदे भरलेली व ९७४ पदे रिक्त आहेत. तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-ब संवर्गाची १०५२ पदे मंजूर असून त्यापैकी ९८९ पदे भरलेली व ६३ पदे रिक्त आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागात गट-अ ते गट-ड संवर्गातील एकुण ५३४७९ पदे मंजूर असून त्यापैकी ४००१६ पदे भरलेली आहे व १३४६० पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचे प्रमाण २५ टक्के आहे.

तथापि, उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक ती रुग्णसेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.
(२) वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे स्थायी स्वरुपात भरण्याबाबत स्वतंत्र निवड मंडळामार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच कंत्राटी पध्दतीने रिक्त पदांवर नेमणुका देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क व ड कर्मचाऱ्यांची रिक्त पदे स्थायी स्वरुपात भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिला बचत गटांना कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध करुन देणेबाबत

**(९) * ३१८२ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महिलांचे सबळीकरण व सक्षमीकरण करण्यासाठी निर्माण झालेल्या महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंना बाजारपेठ मिळत नसल्याने सदर बचत गट बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला बचत गटांच्या उत्पादित मालांची विक्री होण्यासाठी मोबाईल विक्री केंद्र सुरू करणे, वाहन उपलब्ध करुन देणे तसेच बचत गटांना कायमस्वरुपी बाजारपेठा उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच महिला बचत गटांना ठराविक रक्कमेपर्यंत विना टेंडर कामे देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) माविम स्थापित गटामधील ८०% महिला या डेअरी, शेळीपालन, भाजीपाला विक्री, कुक्कुटपालन व अन्नप्रक्रिया करणे या क्षेत्रात गुंतलेल्या आहेत. या क्षेत्रामधील ३०-३० महिलांचा गट तयार करुन Micro Livelihood Plan (MLP) तयार केलेले आहेत. त्यांना बाजारपेठ मिळवून देणे, तांत्रिक सल्ला व स्थानिक पातळीवर Support System देण्यात येत आहे. काही महिला वैयक्तिक स्तरावर स्वयंरोजगार करित असून, त्यांना जिल्हा स्तरावरील व राज्य स्तरावरील प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात येते. त्याचबरोबर माविम स्तरावरुन नवीन 'ब्रॅड' विकसीत करण्यात येत आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये माविम बॅकवर्ड व फॉरवर्ड लिंकेजेस करुन देत आहे.

महिला बचत गटांची उत्पादने विक्रीसाठी मोबाईल व्हॅन योजना राबविण्यास शासनाने मान्यता दिली असून सदर योजना सन २०१५-१६ पासून राबविण्यात येणार आहे.
(३) (४) (५) महिला बचत गटांना ठराविक रक्कमेपर्यंत विना टेंडर कामे देण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील अंबोली धरणग्रस्तांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत

**(१०) * ३८६२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील अंबोली धरणाचे काम सहा वर्षापूर्वी पूर्ण झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरण पूर्ण होवून सहा वर्षे झाली तरी शेतकऱ्यांना संपादित केलेल्या जमिनीची २० टक्के रक्कम अद्याप देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी ही बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात जिल्हा प्रशासनाचे लक्षात आणून शेतकऱ्यांना रक्कम अदा करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी जिल्हा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) नाही. धरणासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा पूर्ण मोबदला शेतक-यांना वितरीत करण्यात आला आहे.

(३) व (४) यासंदर्भात माहे, जानेवारी २०१५ च्या दुस-या आठवडयात अंबोली योजनेसंदर्भात भूसंपादन आढावा बैठक जिल्हाधिकारी, रायगड यांचे दालनात आयोजित करण्यात येवून कालवा भूसंपादनाच्या बाबतीत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रायगड, या कार्यालयाकडून अंतिम निवाड्याची कार्यवाही प्रगती प्रथावर आहे.

-----------------

**राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा लागू करण्याबाबत**

**(११) * ३७६० श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा लागू करण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय राज्यातील निमशासकीय संस्था (कार्यालये) यांना लागू नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील निमशासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) करिता हे खरे नाही. राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा लागू करण्याचा निर्णय घेतलेला नाही.

-----------------

**राज्य शासनाने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना व अनुदानित संस्थांमधील शिक्षक शिक्षकेत्तरांना ६ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत**

**(१२) * ३२४६ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना व अनुदानित संस्थांमधील शिक्षक शिक्षकेत्तरांना ६ वा वेतन आयोग दिनांक १ जानेवारी, २००६ पासून लागू केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २००६ ते दिनांक २६ फेब्रुवारी, २००९ या कालावधीत निवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना व अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाची वेतन संरचना अमान्य केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ८९८५/२०११, ८९०८/२०११, १३५/२०१२, ८७३४/२०११, १३२/२०१२ व अन्य याचिकांमध्ये दिनांक ९ मे, २०१४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार वित्त विभागाने काय कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ जून, २०१४, दिनांक २१ जून, २०१४, दिनांक १४ जुलै, २०१४ च्या निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली आहे,
(५) असल्यास, मा.वित्त मंत्री यांनी दिनांक ९ जून, २०१४ रोजी वित्त विभागास पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने वित्त विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांनी काय कार्यवाही केली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे. राज्य शासनाने राज्य सरकारी कर्मचा-यांसह अनुदानित संस्थांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना दि. १ जानेवारी, २००६ पासून ६ वा वेतन आयोग लागू केला आहे.
(२) हे खरे नाही. राज्य शासनाने राज्य सरकारी कर्मचा-यांसह अनुदानित संस्थांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना दि. १ जानेवारी, २००६ पासून ६ वा वेतन आयोग लागू केला आहे. म्हणजेच दि. १ जानेवारी, २००६ पासून ६ व्या वेतन आयोगाची वेतन संरचना मान्य केली आहे.
(३), (४), (५) व (६) करिता या सर्व याचिका या मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या नसून त्या मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झाल्या होत्या.

या सर्व याचिका प्रश्न भाग-२ मध्ये विचारलेल्या वेतन संरचनेबद्दल नसून निवृत्तीवेतन परिगणित करण्याच्या सुधारित सुत्राकरिता विहीत करण्यात आलेल्या दिनांका संदर्भातील आहेत. दि.२७.२.२००९ पासून २० वर्षाच्या अर्हताकारी सेवेवर पूर्ण निवृत्तीवेतन देण्यात आले आहे. हा लाभ दि.१.१.२००६ पासून देण्यात यावा अशी याचिकाकर्त्यांची मागणी होती.

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी या सर्व याचिका (याचिका क्र.८९५/२०११, ८९०८/२०११, १३५/२०१२, ८७३४/२०११, १३२/२०१२, ३९३४/२०१३) एकत्रित केल्या व शासनाच्या दि.३०.१०.२००९ च्या शासन निर्णयातील दि.२७.२.२००९ ही cut off date unconstitutional असल्याचा निर्णय दि.९.५.२०१४ रोजी देऊन या शासन निर्णयातील सर्व लाभ similarly situated कर्मचा-यांना दि.१.१.२००६ पासून लागू करण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी प्रश्न भाग-४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये लोकप्रतिनिधींनी केली आहे.

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या दिनांक ९.५.२०१४ रोजीच्या निर्णयाविरुध्द दिनांक १०.११.२०१४ रोजी पुनर्विलोकन याचिका मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आली.

सदर पुनर्विलोकन याचिका मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दि. १६.१.२०१५ रोजी फेटाळली.

राज्य शासनावर येणारा आर्थिक भार विचारात घेऊन या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**महाराष्ट्र राज्यातील दमणगंगा खोऱ्यातील १३३ टीएमसी पाणी
गुजरात राज्याला देणाऱ्या कराराबाबत**

**(१३) * २८०९ डॉ.अपूर्व हिरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती स्मिता वाघ : तारांकीत प्रश्न क्रमांक. ११४० ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात.:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी गुजरातमध्ये नेण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून प्रयत्न होत असल्याने हे पाणी महाराष्ट्राला मिळण्यासाठी विविध राजकीय व सामाजिक संस्थांनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास नाशिक येथे सामुहिक लाक्षणिक उपोषण तसेच विविध आंदोलने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पातील २० अब्ज घनफुट पाणी मुंबईला देवून उर्वरित ६३ अब्ज घनफुट पाणी गुजरातला दिले जाणार असल्याची माहिती दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दमणगंगा-पिंजाळ प्रकल्पातील पाणी मुंबईला देवून उर्वरित पाणी गोदावरी खोऱ्यातील नाशिक मराठवाडा व नगर जिल्ह्यातील दुष्काळी भागाला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी नर्मदा लिंक प्रकल्पाच्या मंजुरी संदर्भात केंद्रीय जलसपंदा मंत्री यांनी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक घेतली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाच्या नदीजोड प्रकल्पांतर्गत नर्मदा नदीवरील सरदार सरोवराच्या बाजूने गुजरातकडे जाणाऱ्या लिंकसाठी ५७ टीएमसी पाणी गरजेचे असून त्यासाठी राज्याचे २१ टीएमसी पाणी वापरल्याने गोदावरी, तापी खोऱ्याची तूट पूर्ण न झाल्याने खोऱ्यातील बांधकाम, सर्वेक्षण, उपाययोजना यासाठी पाणी न मिळाल्याने राज्यातील २५ टक्के क्षेत्रावर पाणीटंचाई निर्माण होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक, भूगड व पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील धरणे बांधून मुंबईला पाणी पुरवठा करण्यासंदर्भातील “डीपीआर” महाराष्ट्र सरकारला पूर्णपणे अंधारात ठेवून गुजरात मधील बलसाड येथे एन.डब्ल्यु.डी.ए. या कार्यालयात तयार झाला. हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, अनेक सामाजिक संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला असल्यामुळे शासनाने हा करार रद्द करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) असल्यास, सदर प्रकल्पाचे राज्याच्या वाट्याचे हक्काचे पाणी मिळण्याविषयी सरकारने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(९) तसेच या नदीजोड प्रकल्पाद्वारे खानदेशात अतिरिक्त पाणी मिळणार आहे काय,
(१०) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) दमणगंगा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी मुंबई शहरासाठी पिण्याच्या पाण्यासाठी देण्याचे प्रस्तावित आहे.
(३) होय.
(४) होय.
(५) नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.
(८) दमणगंगा खो-यातील राज्याच्या हिश्याचे पाणी मुंबई शहरास वळविणेबाबतचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. तसेच दमणगंगा खो-यातील १४३ दलघमी पाणी गोदावरी खो-यात वळविणेबाबतचा पूर्व व्यवहार्यता अभ्यास राष्ट्रीय जल विकास अभिकरणाने केलेला असून त्याबाबतचा सविस्तर अहवाल तयार करण्याची विनंती राष्ट्रीय जल विकास अभिकरणास करण्यात येत आहे.
(९) नार-पार-अंबिका खो-यातील पाणी गिरणा खो-यात वळविणेबाबतच्या वळण योजनेच्या सर्वेक्षण कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या योजनेमुळे सुमारे ९७७६० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळू शकतो. तसेच १४६.२४ दलघमी पाणी बिगर सिंचन प्रयोजनास उपलब्ध होऊ शकतो.
(१०) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत भरती प्रक्रियेत झालेला अपहार

**(१४) * ३४३१ श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २९३ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत झालेल्या भरती प्रक्रियेत अपहार झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यांत आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पेपरफुटी प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), व (३), ची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत भरती प्रक्रियेसंबंधीत दिनांक २/११/२०१४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या परिक्षांच्या प्रश्नपत्रिकेच्या उत्तरतालिका आर्थिक गुन्हे शाखा औरंगाबाद यांचेकडून जप्त करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार पोलीसांनी एकूण ११ इसमांविरुध्द गुन्हा नोंदविलेला असून सदर ११ आरोपीता विरुध्द मा.न्यायालयात गुन्हा दाखल (क्र.आरसीसी २०९८/२०१४) केला आहे. तसेच या गुन्ह्याशी संबंधीत अन्य एका आरोपीस दिनांक ३०/०१/२०१५ रोजी अटक करण्यात आली असून या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हा निवड समितीने दिनांक २/११/२०१४ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षा रद्द केलेल्या असून या परिक्षा नव्याने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१४ रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक २२/११/२०१४ रोजी परिचर या पदाची लेखी परिक्षा केंद्रावर सुरु असताना केंद्रावरील समवेक्षकामार्फत केंद्रावरुन केंद्राबाहेर गेल्याचे पोलीस निरिक्षक वडगांव रोड, यवतमाळ यांनी जि.प.ला कळविल्यामुळे संबंधित समवेक्षकास निलंबीत करण्यात आले असून त्यांचे विरुध्द FIR No ५२८, दिनांक २२/११/२०१४ रोजी फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. सद्यःस्थितीत या प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

सदर बाब घडल्यामुळे परिचर या पदाची लेखी परिक्षा रद्द करुन नव्याने दिनांक ०४/०१/२०१५ घेण्यात आली असून त्याबाबतचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात**
**सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१५) * ४०६३ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यात ग्रामीण रुग्णालय बांधून अनेक वर्षे उलटून गेली तरी अद्यापपर्यंत याठिकाणी अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध केलेल्या नाहीत तसेच रुग्णालयाची दुरावस्था झाल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) वाडा (जि.पालघर) येथील रुग्णालयावर २ लाख नागरिकांना आरोग्यव्यवस्था पुरविण्याची जबाबदारी असतांना अवघ्या ३० खाटांच्या या रुग्णालयात एकही कायमस्वरुपी डॉक्टर नसल्याने या भागातील गोर-गरीब रुग्णांना उपचारासाठी खाजगी रुग्णालय अथवा ठाणे येथे उपचारासाठी जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.आरोग्य मंत्री यांना लेखी निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयांत अद्यावत सुविधा पुरविण्याबाबत व रुग्णालयाची दूरवस्था दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) हे खरे नाही. वाडा येथील रुग्णालयात प्रतिनियुक्तीने वैद्यकीय अधिकारी गट-अ (वर्ग-२) या संवर्गातील ३ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत तसेच बंधपत्रित डॉक्टरांच्या सेवा देखील उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
रुग्णालयाचे सर्व विभाग एकत्र असण्याच्या दृष्टीने नवीन इमारत बांधण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**देवरुख (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयातील अधिक्षकांचे रिक्त पद भरण्याबाबत**

**(१६) * ३७८८ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरुख (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयातील अधिक्षक यांची रत्नागिरी येथे जिल्हा शासकीय रुग्णालयात बदली झाल्यानंतर गेल्या तीन महिन्यांपासून सदर रुग्णालयात हे पद रिक्तच आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे सदर रुग्णालयाचा कारभार प्रभारीवर अवलंबून आहे त्याचप्रमाणे तीन पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे गरीब व गरजु रुग्णांची गैरसोय होत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) व (३) सदर रुग्णालयातील नियुक्त ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी २ वैद्यकीय अधिकारी अनधिकृतपणे गैरहजर असल्याने सद्यःस्थितीत उपलब्ध वैद्यकीय अधिकारी तसेच कंत्राटी विशेषज्ञामार्फत उपचार करण्यात येत आहेत.

रुग्णालयामार्फत रुग्णांना मोफत रुग्णसेवा पुरविली जात असल्याने रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. असे म्हणता येणार नाही.

(४) वैद्यकीय अधिक्षकाचे रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. वर्ग-३ व वर्ग-४ मधील रिक्त पदे उपसंचालकाच्या स्तरावर भरण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन प्रकल्पावरील बंदी उठविण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१७) * ३९४० श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन प्रकल्पावरील बंदी उठविण्यासाठी तत्कालीन मंत्री मंडळाने बैठकीत चर्चा करून मा.राज्यपाल यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्यांचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,

(२) या अनुषंगाने मराठवाड्यातील टंचाईग्रस्त व आदिवासी भागाकरिता सिंचनाची सोय उपलब्ध करण्यासाठी प्रस्तावित २६ प्रकल्पांच्या योजनांचे मा.राज्यपाल महोदयांच्या सन २०१४-१५ च्या निदेशान्वये प्रकल्प घेण्यास मान्यता देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी त्यांचे दि.०५ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मा.राज्यपाल महोदयांना विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात राबविण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेबाबत**

**(१८) * ३५२१ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१५ पासून राज्यात जलयुक्त शिवार योजना राबविण्याचा व त्यासाठी रक्कम रुपये १ हजार कोटीची आर्थिक तरतूद करण्याचा व त्यामधून रक्कम रुपये ६०० कोटी माहे जून, २०१५ पर्यंत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयानुसार वर्षभरात राज्यातील गावे टंचाईमुक्त करण्यात येणार असून त्यापैकी अडीच हजार गावांतील कामांची सुरुवात दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारापासून करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिवार योजनेचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, सदर जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत ५ हजार गावे टंचाई मुक्त करणे, सन २०१५-१६ या वर्षात १० हजार साखळी सिमेंट नाला बंधारे बांधण्याचे तसेच टंचाईग्रस्त विदर्भ, मराठवाड्यात एक लाख विहीरी खोदणे इत्यादी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार आजपावेतो किती गावातील कामांना सुरुवात करण्यात आली व त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व त्यापैकी किती खर्च झाला आहे,
(६) असल्यास, सदर योजनाधीन कामांना सुरुवात झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(७) असल्यास, वरील उपक्रम पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.

वर्षभरात ६००० गावे टंचाईमुक्त करण्यात येणार असून दि. २६ जानेवारी २०१५ रोजी १८०६ गावांमध्ये कामांची सुरवात करण्यात आली आहे.
(३) सदर अभियानामध्ये पाणलोट विकासाचे कामे व इतर सलंग्न कामे अशी १३ प्रकारची कामे / उपचार कृषी विभाग लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, जलसंपदा विभाग, वन विभाग, सामाजिक वनिकरण विभाग, ग्रामविकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग व जिल्हा परिषद, सीएसआर निधी व लोकसहभाग यामधुन राबविण्यात येत आहे.
(४) होय, हे अंशतः खरे आहे.

जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये एकूण ६ हजार गावे टंचाई मुक्त करण्याचे नियोजन असुन, या कालावधीत वर्षात सुमारे १० हजार साखळी सिमेंट नाला बंधारे व इतर जलसंधारणाची संलग्ल कामे यासाठी रु. १००० कोटी तसेच सुमारे ४४,००० विहीरी पुढील २ वर्षात खोदण्याचे नियोजन आहे.
(५) फेब्रुवारी २०१५ अखेर २७४१ गावांमध्ये ६१२४ कामे सुरु आहेत. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ७५ कोटी वितरित केला असुन सन २०१५-१६ करिता रु.१००० कोटी जिल्हा नियोजन विकास समिती मार्फत उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती लघु सिंचन (जलसंधारण) विभागाअंतर्गत कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत**

**(१९) * २९२६ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती लघु सिंचन (जलसंधारण) विभागाअंतर्गत करावयाच्या ६०८ कामांसाठी रु. १९७.४०५ कोटी व लघुसिंचन विभाग जिल्हा परिषदेला ६४२ कामांकरिता रु. ६०.१४५ कोटी असे एकूण १२५० कामांसाठी २५७.५५ कोटी रुपयांस मान्यता दिलेल्या निधीला खर्च करण्यास स्थगनादेश देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खर्चाला स्थगनादेश देण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त स्थगनादेश उठविण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही

निधी खर्च करण्यास कोणताही स्थगन आदेश नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शहरी भागातील बालकांच्या कुपोषणाबाबत**

**(२०) * ४१३१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ५००६९ ला दिनांक १४ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरांमध्ये विशेषत: मुंबईतील (मालवणी), ठाणे, मालेगाव, सोलापूर, इचलकरंजी, नांदेड, यवतमाळ, नागपूर, पिंपरी व बल्लारपूर इत्यादी भागांमध्ये १७ टक्के बालके मध्यम आणि तीव्र कमी वजनाची तसेच कुपोषित असल्याची बाब “एकात्मिक बालविकास सेवा” योजनेतंर्गत झालेल्या सर्वेक्षणाच्या अहवालातून माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) हिमायतनगर (ता.जि.नांदेड) येथे १७१ बालके तीव्र कुपोषित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरी भागात केलेल्या सर्वेक्षणामध्ये १५ लाख ५४ हजार बालकांपैकी ८ लाख ८१ हजार बालके सामान्य वजनाची तर १ लाख ८० हजार बालके मध्यम आणि तीव्र कमी वजनाची असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कुपोषणाची तीव्रता कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

हिमायतनगर (ता.जि.नांदेड) या प्रकल्पांमधील माहे जानेवारी, २०१५ च्या मासिक प्रगती अहवालानुसार एकूण वजन घेतलेली बालके ११४२९ इतकी बालके असून त्यामध्ये सर्वसाधारण बालके १०५०६ (९१.९२ %) मध्यम कमी वजनाची बालके ७७० (६. ७४%) व तीव्र कमी वजनाची बालके १५३ (१.३४%) इतकी आहेत.
(३) हे खरे नाही.

मासिक प्रगती अहवालावरुन राज्यातील १०४ शहरी प्रकल्पातील बालकांची श्रेणीनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| कालावधी | एकूण वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| माहे ऑक्टोबर- २०१३ | १०७३३८४ | ८७२५६८ | १८३७८१ | १७०३५ (१.५९%) |
| माहे ऑक्टोबर- २०१४ | १०७३३३२ | ८९७७२० | १६२३५३ | १३२५९ (१.२४%) |

वरील तपशिलावरुन राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत शहरी भागात माहे ऑक्टोबर-२०१३ च्या तुलनेत माहे ऑक्टोबर-२०१४ मध्ये सर्वसाधारण बालकांच्या संख्येत वाढ झाली असून मध्यम व तीव्र कमी वजनाचे बालकांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते.
(४) कुपोषणाला आळा घालण्याकिरता राज्यात राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याव्दारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच VCDC / CTC व्दारे कुपोषित बालकांना आवश्यक सुविधा व उपचार पुरविण्यात येऊन कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत नियमित आहारव्यतिरिक्त पौष्टीक चिक्की, तसेच विविध प्रकारची आरोग्यदायी औषधे इ. चा पुरवठा अंगणवाडीतील लाभार्थींना निधीच्या उपलब्धतेनुसार केला जातो. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो. अंगणवाडीतील बालकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरिता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील गावठाणांच्या हद्दीत अनेक बांधकामे कोणतेही निकष न पाळता करण्यात आल्याबाबत**

**(२१) * ३२७४ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील गावठाणांच्या हद्दीत आजवर अनेक बांधकामे कोणतेही निकष न पाळता अनधिकृतरित्या केली जात होती. नवीन कायद्यामुळे प्रादेशिक आराखडयातील नियमांनुसार व जमा झालेले विकसन शुल्क पायाभूत सुविधांवर वापरण्याच्या अटीवर ही बांधकाम परवानगी ग्राम पंचायतींना देता येणार आहे, मात्र अद्यापही या सर्व निकषांचा अभ्यास करुन बांधकाम परवानगी देणारी तांत्रिकदृष्टया सक्षम यंत्रणा ग्रामपंचायतींकडे उपलब्ध नसल्याने प्रादेशिक आराखडयातील नियमांचे पालन होण्याची शक्यता दुरापास्त झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतींना तांत्रिकदृष्टया सक्षम करण्यासाठी शासन काही अभ्यासक्रमांची (ट्रेनिंग) उपलब्ध करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) अद्याप याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ते (४) पुणे शहरातील गावठाणांच्या हद्दीसह राज्यातील सर्व ग्रामीण भागामध्ये बांधकाम परवानगीच्या प्रक्रियेचे सुलभीकरण करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम २०१४ हा विधिमंडळाच्या डिसेंबर, २०१४ च्या अधिवेशनामध्ये पारित झाला आहे. या सुधारणेनुसार प्रादेशिक योजना असलेल्या प्रदेशातील गावाच्या गावठाण हद्दीतील व प्रादेशिक योजना नसलेल्या ठिकाणी गावाच्या संपूर्ण क्षेत्रासाठी, पंचायत समिती स्तरावर पदस्थापित केलेल्या नगररचना अधिका-याची किंवा पंचायत समिती स्तरावर असा अधिकारी नसल्यास जिल्हा परिषद स्तरावरील नगर रचना अधिका-याची पुर्वपरवानगी घेतल्यानंतर, बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने सविस्तर नियम निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे. दरम्यान सध्या अस्तित्वात असलेल्या तरतुदीनुसार बांधकाम परवानगी देण्याची कार्यवाही सुरु असल्याने प्रादेशिक आराखड्यातील नियमांचे पालन होत नाही, अशी वस्तुस्थिती नाही.

वर नमुद केल्यानुसार ग्रामपंचायतीने परवानगी देण्यापूर्वी नगररचना अधिका-याची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक असल्याने वेगळ्या अभ्यासक्रमाची आवश्यकता नाही.

उपरोक्त सुधारणा अधिनियमान्वये ग्रामीण क्षेत्रात विकासाची परवानगी दिली असेल तेव्हा विकास आकार गोळा करणे आणि अशा प्रकारे गोळा करण्यात आलेली रक्कम संबंधित ग्रामपंचायतींना अभिहस्तांकित करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

-----------------

**काजिर्डा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील जामदा प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत**

**(२२) * ३०९४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काजिर्डा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील जामदा प्रकल्पाच्या कामास मंजूरी मिळाल्यानंतर या प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरू झाल्यानंतर ३ वर्षानंतर संपूर्णत: ठप्प झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे काम गेली ९ वर्षे अपूर्णावस्थेत असून आजही या प्रकल्पाचे काम बंद झाल्याने या प्रकल्पाचे भवितव्य अंधकारमय झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास सदरहू प्रकल्पाचे काम विनाविलंब हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) जामदा प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम मे २००६ मध्ये सुरु केल्यानंतर प्रकल्पाग्रस्तांच्या विरोधामुळे मे २००९ पर्यंत म्हणजेच जवळजवळ ३ वर्षे प्रकल्पाचे काम बंद होते. सन २००९-१० ते सन २०१३-१४ पर्यन्त प्रकल्पाचे काम सुरु आहे.

(२) जामदा प्रकल्प ता.राजापूर.जि.रत्नागिरी हा मध्यम प्रकल्प असून वाघोटन खो-यातील जामदा नदीवर बांधण्यात येत आहे.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर ४८.२५९ द.ल.घ.मी. इतका पाणीसाठा निर्माण होणार असून त्याद्वारे ४९०० हे. पिक क्षेत्र/ ३५०० हे. मुळ क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे, तसेच २.०० मे.वॅट वीज निर्मिती होणार आहे.

(३) या प्रकल्पाचे आर्थिकदृष्टया ५२.३७% काम पुर्ण झाले असून धरणाच्या डाव्या भागाचे काम चालू असून सांडव्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) सुरुवातीला प्रकल्पास प्रकल्पग्रस्तांच्या विरोध असल्याने काम लांबले आहे. भूसंपादन व पुनर्वसनाशी संबंधित कामांना विलंब झाला आहे . सन २०१४ मध्ये आलेल्या भूसंपादन कायद्यातील बदलामुळे जुने प्रस्ताव व्यपगत झाले आहेत. प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहे.

(५) सदर प्रकल्पास सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रु. ३७.३३ कोटी रकमेची अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे.

-----------------

**नागपूर-कळमेश्वर मार्गावरील गोरेवाडा वनक्षेत्रात आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालय उभारण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(२३) * ३८३५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-कळमेश्वर मार्गावरील गोरेवाडा वनक्षेत्रात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालय उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे मात्र अद्याप एकाही विकासकाने प्रतिसाद निर्णय दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयाचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहालय स्थापन करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने दि. २९/११/२०११ रोजी निर्णय घेतला आहे. सदरहू शासन निर्णयानुसार आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहलाय व बचाव केंद्र स्थापनेचे काम एफ.डी.सी.एम लिमिटेड व खाजगी निवेशक यांची विशेष उद्देश व्यवस्थेची (Special Purpose Vehicle) निर्मिती करुन त्यामार्फत करावयाचे आहे.

प्राणीसंग्रहालय करिता केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण (सी.झेड.ए) नवी दिल्ली कडून संकल्प आराखडयाला दि. १७/०५/२०१३ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच मा.सर्वाच्च न्यायालय यांनी दि. ०५/०८/२०१३ रोजी प्राणीसंग्रहलाय व बचाव केंद्र निर्मितीस मान्यता प्रदान केली आहे.

प्राणीसंग्रहालय स्थापनाकरिता सीझेडए, नवी दिल्ली यांचे अटिनुसार प्रकल्प सल्लागार यांनी मास्टर प्लॅन तयार केला असून सी.झेड.ए कडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदर मास्टर प्लॅनला सी.झेड.ए. कडून मान्यता अपेक्षित असून त्यानंतरच व्यापक जाहिरात देऊन खाजगी निवेशकाची (विकासकाची) निवड करण्याकामी प्रक्रिया सुरु करावयाची आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील जिल्हा परिषदेमधील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व महिला व बालकल्याण ही दोन्ही जिल्हा परिषदेमधील खाती रद्द करण्याबाबत**

**(२४) * ३७०९ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेमधील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व महिला व बालकल्याण ही दोन्ही जिल्हा परिषदेमधील खाती रद्द करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,
(३) तसेच जिल्हा परिषदेचा कारभार सक्षमरित्या चालावा म्हणून जिल्हा परिषदेमधील दोन्ही खाती रद्द करण्यात येऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे व पालघर जिल्हयातील २९६ अंगणवाड्यांचे बांधकाम संथगतीने होत असल्याबाबत**

**(२५) * २७१७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व पालघर जिल्हयात सुमारे चार हजाराहून अधिक अंगणवाडी केंद्र सुरू असून बहुतांश अंगणवाडी केंद्र जागेअभावी गावातील सधन व्यक्तींच्या घरी, भाड्याच्या घरात, मंदीराच्या व्हरांड्यात, समाजमंदिरात सुरू असून, बहुतांश अंगणवाड्यांची दयनीय अवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षात एकूण २९६ अंगणवाडी केंद्रांच्या उभारणीसाठी सुमारे १८ कोटी ८० लाख रूपये खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अंगणवाडी केंद्र उभारणीचे काम अत्यंत संथगतीने सुरू असून, पूर्ण झालेल्या अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून, आवश्यक त्या निधी अभावी काही काम बंद पडलेले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू २९६ अंगणवाडी केंद्र उभारणीची कामे शीघ्रगतीने हाती घेऊन पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: हे खरे आहे.
ठाणे व पालघर जिल्हयातील अंगणवाडी केंद्राची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **बांधकाम हाती घेतलेल्या केंद्रांची संख्या** | **बांधकामासाठी जागा उपलब्ध होत नसलेल्या केंद्रांची संख्या** |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | २९७ | ३५४ |
| २ | पालघर | ७७६ | २३७ |
| | **एकूण** | **१०७३** | **५९१** |

(२) होय.

सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ८ कोटी ६५ लाख, आदिवासी उपयोजने अंतर्गत ८ कोटी व मानव विकास मिशन अंतर्गत ३ कोटी २८ लाख असा एकूण १९ कोटी ९३ लाख निधी उपलब्ध करुन दिला असून सदर निधीतून माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर ३०७ अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामांना निधी मंजूर केलेला आहे.

(३) हे खरे नाही.

सदरची कामे ही टप्या-टप्याने मंजूर झालेली असल्याने सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत.

सदरची बांधकामे शाखा अभियंता व उप अभियंता यांचे नियंत्रणात होत असल्याने बांधकामाचा दर्जा चांगला आहे. त्यामुळे पुर्ण झालेली कामे निकृष्ट दर्जाची आहेत असे म्हणता येणार नाही. शासनाच्या Type Plan प्रमाणे सर्व निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(४) सदरहू मंजूर केलेली कामे पूर्ण करणेबाबत गट विकास अधिकारी, उप अभियंता, बाल विकास प्रकल्प अधिकारी, संबंधित शाखा अभियंता व संबंधित ग्रामसेवक यांची वारंवार आढावा सभा घेउुन सदरची कामे मार्च, २०१५ अखेर पूर्ण करुन घेण्याबाबत आदेशित केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(२६) * ३९७५ श्री.राजेंद्र मुळक : तारांकित प्रश्न क्रमांक १२१७ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील वैनगंगा नदीवर ३० वर्षापूर्वी गोसीखुर्द धरण बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली व धरणाचे भूमीपुजनही करण्यात आले परंतु अद्याप एवढ्या वर्षानंतरही प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सुटले नसून नवीन गावठाणावर नागरी सुविधांची कमतरता तसेच लाभ क्षेत्रांचे सिंचन होऊ शकले नाही असे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोसेखुर्दच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने सन २०१० मध्ये १५२ कोटीचे पॅकेज मंजूर केले आहे या पॅकेजमधील कामेही अद्याप मंजूर झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या प्रलंबित असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकल्पग्रस्तासाठी ८५ गावठाणाचे ६४ स्थळी (३ टप्प्यात) पूनर्वसन निश्चित आहे. यापैकी ५३ पर्यायी स्थळी नागरी सुविधाची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित कामे प्रगतीत आहेत.

गोसीखुर्द प्रकल्पाअंतर्गत २,५०,८०० हे, पैकी जुन-१४ अखेर ३९,११६ हे. सिंचन क्षमता निर्माण झालेली असून आतापर्यन्त ८,५८० हे. क्षेत्रावर प्रत्यक्ष सिंचन करण्यांत आले आहे.

(२) दि. २.२.२०१० अन्वये मंजूर रु. १५२ कोटीच्या पॅकेज ची कामे तथा निधी वाटप संबंधित जिल्हाधिकारी नागपूर/भंडारा मार्फत करण्यात येत आहे. त्यातील ९० टक्के निधीचे वाटप झाले आहे.

तसेच गोसीखुर्द प्रकल्पग्रस्ताकरीता मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी १८.०६.२०१३ अन्वये रु. ११९९.६० कोटीचे विशेष पॅकेज मंजूर केलेले असून त्यापैकी ७०० कोटीची रक्कम आयुक्त, नागपूर यांना वाटपाकरीता हस्तांतरीत केलेली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माणगाव ग्रामपंचायत (जि.रायगड) येथील ग्रामसेवकाने केलेला आर्थिक गैरव्यवहार**

**(२७) * ३५९२ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव ग्रामपंचायत (जि.रायगड) भागातील ग्रामसेवक श्री.भुपेश पांडुरंग अहिरे यांनी सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीत त्यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची व नियमबाह्य कामकाज केल्याबाबतचा चौकशी अहवाल पंचायत समिती, माणगांव यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडे दिनांक ९ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चौकशी अहवालात कोणकोणत्या बाबी आढळून आल्या आहेत व तदनुसार संबंधीत ग्रामसेवकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) चौकशी अहवालानुसार, संबंधित ग्रामसेवक यांनी आर्थिक अनियमितता व नियमबाह्य कामकाज केल्याचे दिसून आल्याने संबंधित ग्रामसेवक यांना दि. २०.१०.२०१४ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी बालधोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२८) * २९६४ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या हक्कांचे संरक्षण व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचार विरोधात राज्यात बालसंरक्षण कक्षाची स्थापना करण्यासाठी आराखडा तयार करून बालधोरण तयार करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्राच्या एमएससीपीसी व राज्याच्या महिला बालविकास विभागाच्या अधिकारावरुन वाद निर्माण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने तयार करण्यात आलेल्या बालधोरणाची अंमलबजावणी केली नसल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, बालधोरणाची लवकरात लवकर अंमलबजावणी करुन बालसंरक्षण कक्षाचा कारभार सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) बाल धोरण जाहिर करण्यात आले असून याबाबतचा शासन निर्णय दिनांक ४.३.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(४) व (५) बाल धोरणाची अंमलबजावणी करुन बाल संरक्षण कक्षाचा कारभार सुरळीत करण्याकरीता जिल्हा स्तरावर जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

-----------------

**चंद्रपूर, गडचिरोली अमरावती (मेळघाट) येथील बालमृत्यूचे प्रमाण कमी करणेबाबत**

**(२९) * २९३५ श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक २२०९५ ला दिनांक १९ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती (मेळघाट) येथील वाढते बालमृत्यू व कुपोषणाचा प्रश्न सोडविण्याकरीता राजमाता जिजाऊ माता बालक आरोग्य आणि पोषण आहार मिशन राबवूनही कुपोषण व बालमृत्यू कमी झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विभागात बालरोग तज्ञ नसणे, औषधाचा अपूरा पुरवठा, शासकीय दवाखान्यात जेवणाची व्यवस्था नसणे, दवाखान्यातील रिक्त जागा या सर्व कारणामुळे कुपोषण व बालमृत्यू वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी धरणातील गाळ काढण्याबाबत**

**(३०) * ४०२० श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: विदर्भातील धरणामध्ये सर्वाधिक गाळ साठल्यामुळे दरवर्षी सिंचन क्षमतेत सरासरीने ०.२५ टक्के घट होत असल्याचे जलसंपदा विभागाने आपल्या अहवालात माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मराठवाडयातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मराठवाड्यातील धरणातील गाळ काढण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे.

सिंचन विषयक चौकशी समितीच्या अहवालानुसार, एकूण सरासरीने ३४ वर्षाच्या कालावधीत ६१ धरणातील पाणी साठा केवळ ८.५ टक्के कमी झालेला आहे. म्हणजेच गाळ साठल्यामुळे दरवर्षी सिंचन क्षमतेते सरासरीने केवळ ०.२५ टक्के घट होत असल्याचे निदर्शनास येते.
(२) होय.
शासनाचे पत्र क्र मानीव - २०१५/०२/१५/ लाक्षेवि (आस्था) दि. २०/१/२०१५ नूसार जे प्रकल्प कोरडे झाले आहेत त्या प्रकल्पातील गाळ काढण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे अशा सुचना दिल्या आहेत.
(३) मराठवाड्यात (१) अप्पर दुधना मध्यम प्रकल्प, ता.बदनापूर, (२) डावरगांव लघु प्रकल्प, ता.अंबड, (३) पेडगांव लघु प्रकल्प, ता.परभणी, (४) पिंपळदरी साठवण तलाव, ता.गंगाखेड, (५) केहाळ लघु प्रकल्प, ता.जिंतुर या प्रकल्पांमधील गाळ काढण्याचे काम जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जिल्हा प्रशासनाने पुरविलेल्या यांत्रिकी विभागाचे मशिनीद्वारे तसेच ६ लघु प्रकल्पातील गाळ काढण्याचे काम दुरस्ती, नुतनीकरण व पुर्नस्थापना (RRR) अंतर्गत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**चांभारशेत (जि.ठाणे) येथे जव्हार जिल्हापरिषद अंतर्गत आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३१) * २९९५ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांभारशेत (ता. जव्हार जि.ठाणे) येथील जिल्हापरिषद अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत ४ वर्षापूर्वी उभारण्यात आलेल्या आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्यात न आल्याने रुग्णाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) आरोग्य विभागात जवळजवळ ४१ पदे रिक्त असल्याने आदिवासींची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(५) असल्यास, सदर रिक्त पदांबाबत व अपुऱ्या सोयी सुविधांबाबत ग्रामस्थांनी स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी व निवदने देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

चांभारशेत उपकेंद्र हे राष्ट्रीय आरोग्य अभियानातर्गत उभारण्यात आलेले नसून सदर उपकेंद्र हे शासकीय अनुदानातून उभारण्यात आलेले आहे. तसेच सदर उपकेंद्रामधील मंजूर असलेली पदे भरण्यात आलेली आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

जव्हार तालुक्यातील आरोग्य विभागात एकूण १६९ मंजूर पदे असून, त्यापैकी १२८ पदे भरलेली आहेत व उर्वरित ४१ पदे रिक्त आहेत. मात्र, रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून संबंधित रिक्त पदांचा कार्यभार अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

(५) हे खरे नाही.

रिक्त असलेल्या पदांचा कार्यभार अन्य अधिकारी व कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.
(६) व (७) ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन दिनांक १.८.२०१४ रोजी नवीन पालघर जिल्हा निर्माण झाला असून, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत कर्मचारी भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

-----------------

**गडचिरोली या नक्षलग्रस्त आदिवासी जिल्ह्यातील शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्यांऐवजी परराज्यातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे काम करीत असल्याबाबत**

**(३२) * ३८९५ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली या नक्षलग्रस्त आदिवासी जिल्ह्यात शासकीय सेवेचे वैद्यकीय अधिकारी सेवा बजावत नसल्याने छत्तीसगड राज्यातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ एटापल्ली, भामरागड, कोरची, सिरोंचा या तालुक्यातील (जि.गडचिरोली) सीमावर्ती भागात गडचिरोली जिल्ह्यात येवून डॉक्टरी सेवा करुन दुर्गम व अतिदुर्गम भागातील रुग्णाच्या जीवाशी खेळच सुरु असून, शासनाचा आरोग्य विभाग याप्रकाराबाबत अनभिज्ञ असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात शासकीय आरोग्य सेवेशिवाय पर्यायी आरोग्य सेवा नाही तसेच शासनाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याची अनेक पदे रिक्त असल्याने कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे आणि काही आरोग्य केंद्रापर्यंत दळणवळणाची साधने नसल्याने पोहोचत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, गडचिरोली या नक्षलग्रस्त आदिवासी जिल्ह्यातील एटापल्ली, भामरागड, कोरची, सिरोंचा या अतिदुर्गम सीमावर्ती भागातील जनतेस चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तसेच दोषी डॉक्टराकडून रुग्णांची होणारी फसवणूक कायमस्वरुपी बंद होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही. एटापल्ली, भामरागड, सिरोंचा या तालुक्यामध्ये छत्तीसगड राज्यातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ वैद्यकिय व्यवसाय करत असल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. मात्र सदर प्रकरणी तपासणी करण्याचे निर्देश संचालक आरोग्य सेवा, यांना देण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही, गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली, भामरागड, कोरची व सिरोंचा या तालुक्यामध्ये ३० खाटांचे प्रत्येकी एक ग्रामीण रुग्णालय, १३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ७ प्राथमिक आरोग्य पथक कार्यरत आहेत. सदर ठिकाणी वैद्यकीय अधिकारी गट- अ संवर्गातील

एकूण ३६ पदे मंजूर असून त्यापैकी २५ स्थायी, ८ बंधपत्रीत व २ अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत. सदर वैद्यकीय अधिका-यांकडून रुग्णांना आवश्यक ती रुग्ण सेवा उपलब्ध करून दिली जात आहे. तसेच एटापल्ली, भामरागछ, कोरची व सिंरोचा येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिका उपलब्ध असून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी संचालक आरोग्य सेवा यांचे कडून तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यात गर्भपाताचे प्रकार रोखण्याबाबत**

**(३३) * ३३०७ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २३५५ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सध्या गर्भपाताचे प्रमाण वाढत असून मागील काही महिन्यात तब्बल ८५ हजार ६११ गर्भपात करण्यात आल्याचा गंभीर प्रकार नुकताच निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार गर्भपाताचे प्रकार रोखण्याबाबत तसेच गर्भपात करणाऱ्या केंद्रावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

तथापि वैद्यकिय गर्भपात कायदा १९७१ नुसार सदर गर्भपात कायदेशीर व सुरक्षितरित्या करण्यात आले आहेत.
(२) वैद्यकिय गर्भपात कायदा १९७१ मध्ये लागू करण्यात आला आहे. या कायद्यामध्ये २० आठवड्यापर्यंत असुरक्षित गर्भपातामुळे होणारे मातामृत्यू टाळण्यासाठी वैद्यकिय गर्भपातास परवानगी देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने संबंधित गर्भपात कायदेशीर करण्यात आल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे पेन्शनमध्ये वाढ करण्याबाबत**

**(३४) * ३६३७ श्री.नरेंद्र पाटील, अॅड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे पेन्शनमध्ये पुर्वलक्षी वाढ दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजीपासून राज्य शासनाने केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभक्त कुटुंब पध्दतीमुळे हलाखीचे जीवन जगणाऱ्या ज्येष्ठ सरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याबाबतचे शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) हे खरे नाही. केंद्र शासनाने केंद्रीय निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात दिनांक १ जानेवारी, २०१५ पासून कोणतीही वाढ केलेली नाही. त्यामुळे त्यानुसार राज्यातील निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरांना त्यांच्या रोजगाराची रक्कम मिळण्याबाबत**

**(३५) * ३१५० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांवरील मजूरांना वेळेत मजूरी मिळावी, गैरव्यवहाराला वाव मिळू नये आणि व्यवहारांमध्ये पारदर्शकता असावी यासाठी मजूरी थेट बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. परंतु या उपक्रमाला तांत्रिक चुकाचा फटका बसू लागला असून चुकीचे खाते क्रमांक टाकून खाते गोठविल्यामुळे ६४ हजार प्रकरणे प्रंलबित असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कारवाई होण्याबाबत, तांत्रिक चुका दूर करण्याबाबत तसेच रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरी त्वरीत मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, वरील प्रकरणी विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) राज्यात Electronic Fund Management System (EFMS) प्रणालीद्वारे मजूरांची मजूरी त्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची कार्यपध्दती नव्याने सुरु झाल्याने सुमारे ६८.५०३ व्यवहारांमध्ये रक्कम शासन खात्यात परत जमा झाली आहे.

मजूरीची रक्कम खात्यात जमा न होण्याची सर्वसाधारण कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

(अ) मजुरांचा खाते क्रमांक चुकीचा असणे,

(ब) मजुरांचे खाते सुप्त (Dormant) असणे,

(क) बँका कोअर बँकींग प्रणालीवर असल्याने बँकांनी मजुरांचे खाते क्रमांक बदलणे.

या रक्कमा राज्य खात्यात परत आलेल्या आहेत.

(३) १) याबाबत सर्व जिल्हयांना आवश्यक निर्देश दिनांक ७/१/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

२) विशेष मोहिम हाती घेऊन अशा सर्व प्रकरणात मजुरांचा बँकेचा अचूक खाते क्रमांक प्राप्त करुन, खाते "Active" करुन मजूरी अदा करण्यात येत आहे. दिनांक ४/ ३/ २०१५ अखेर ६७ % प्रकरणात प्रदान पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित प्रकरणात दि. १५/३ /२०१५ पर्यंत कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

३) पुनरावृत्ती टाळण्यासाठी जिल्हा स्तरावरील सर्व सहायक लेखाधिकारी यांना आवश्यक सनियंत्रण ठेवणेबाबत निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केमसे घाटमाथा (ता.पाटण जि.सातारा) येथे होत असलेली अवैध वृक्षतोड**

**(३६) * ३१२८ श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक समृध्दतेचा मानबिंदू असलेल्या सहयाद्री व्याघ्र प्रकल्पातील केमसे घाटमाथा (ता.पाटण जि.सातारा) येथे हजारो वृक्षांची अवैध वृक्षतोड सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षांची होत असलेली अवैध वृक्षतोड त्वरीत थांबविण्याबाबत तसेच वृक्षांची अवैध तोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) पाटण तालुक्यातील कोयना अभयारण्याबाहेरील मौजे केमसे या गावातील मालकी गट नं ४/१ व ३५/४ मधील दोन प्रकरणात सुमारे २ ते २.५ हेक्टर मालकी क्षेत्रावरील ६७६ हाडांची तोड झाली आहे.

(२) व (३) सदर दोन प्रकरणांमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

महाराष्ट्र (वृक्षतोड) अधिनियम , १९६४ व सुधारीत १९८९ कलम ३ व ४ नुसार वनक्षेत्रातील पाटण यांनी मौजे केमसे मालकी गट नं ४/१ व ३५/४ मधील अनुसूचित वृक्ष प्रजातीची ३३२ झाडे तोडल्याबाबत श्री.दत्तात्रय बबन उंद्रे रा. मांजरी खुर्द, ता.हवेली, जि.पुणे व इतर २ यांना एकूण रु.१,१५,२००/- रुपये दंड करुन ६३.०० घ.मी. जळावु किटा सरकार जमा करण्यात आला आहे.

तसेच उप विभागीय अधिकारी, पाटण यांनी केमसे गट नं.४/१, ३५/४ मधील बिगर अनुसूचितील वृक्ष प्रजातीची एकूण ३४४ झाडे विनापरवानगी तोडल्याबद्दल श्री.दत्तात्रय बबन उंद्रे, रा.मांजरी खुर्द, ता. हवेली व इतर २ व्यक्तींना रु.५९,०२४ /- इतका दंड करुन तहसिलदार पाटण यांचेकडे शासकीय खनिज्यात जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

-----------------

**पाथरी-मानवत-सोनपेठ तालुक्यात (जि.परभणी) सिमेंट नाला बंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(३७) * २७८० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी-मानवत-सोनेपेठ तालुक्यात दुष्काळी परिस्थितीची तीव्रता कमी करण्यासाठी उपाययोजना म्हणून सिमेंट कॉंक्रिट नाला बांध बांधण्यासाठी माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान कोटयवधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील कामे प्रत्यक्षात न करता तसेच झालेली कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आली असल्याने, त्याकामांची चौकशी करावी अशी मागणी येथील पत्रकारांनी सन २०१४-१५ दरम्यान मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी कंत्राटदार, समित्या व अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याप्रकरणी विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

पाथरी-मानवत-सोनपेठ या तीन तालुक्यांकरिता रुपये ३.६० कोटी निधी दि. २२ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन दिलेला आहे.

(२) नाही.

तथापि लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(३) तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता लघु सिंचन (जलसंधारण) विभाग लातुर यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी अहवाल अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ रुग्णांना न देणा-या रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत

**(३८) * ४२७४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी योजनेतील लाभार्थींवर उपचार करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील १६ रुग्णालयांना सूचित केले आहे. त्यासाठी सदर रुग्णालयांना रुग्णांसाठी २५ टक्के बेड आरक्षित ठेवणे सक्तीचे असूनही रुग्ण उपचारास दाखल झाल्यावर त्यांना जीवनदायी योजनेचा बेड शिल्लक नसल्याचे सांगितले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णांकडून “मी योजनेचा लाभ न घेता रक्कम भरण्यास तयार आहे” असे लिहून घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच याबाबत रुग्णांच्या १००० तक्रारी असल्याचे जिल्हा समन्वयांकडून सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, रुग्णांना जीवनदायी योजनेचा लाभ न देणाऱ्या यशोधरा व सिव्हिल रुग्णालयाच्या व्यवस्थापनेतील अधिकारी/कर्मचारी व डॉक्टर्स यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही, योजनेंतर्गत खाटा शिल्लक नसल्याने रुग्णास दाखल करुन घेण्यास रुग्णालयाने नकार दिल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) अंशतः खरे आहे. सोलापूर जिल्ह्यातील रुग्णालयांकडून “मी योजनेचा लाभ न घेता रक्कम भरण्यास तयार आहे” असे लिहून घेतल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि सदर रुग्णालयांबाबत अन्य विविध स्वरुपांच्या ८९४ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) योजनेंतर्गत प्राप्त विविध ८९४ तक्रारींपैकी ७४३ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून उर्वरित १५१ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून उर्वरित १५१ तक्रारींचे निराकरण करण्याबाबत रुग्णालयांकडे पाठपुरावा सुरु आहे.

(४) यशोधरा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकडून योजनेच्या लाभार्थी रुग्णांकडून उपचाराकरिता पैसे घेणे तसेच उपचारास नकार देणे याबाबत प्राप्त तक्रारींनुसार सदर रुग्णालयास दि. ५ फेब्रुवारी, २०१५ पासून योजनेमधून निलंबित करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर या रुग्णालयाने रुग्णांकडून पैसे घेतल्याच्या एकूण ३६ तक्रारी प्राप्त झाल्या असून सदर तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याबाबत अधिष्ठाता यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच अधिष्ठाता यांनीही सर्व डॉक्टर्स व कर्मचारी यांना लेखी सक्त ताकिद दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी पूर्वे एमआयडीसी परिसरातील कामगार रुग्णालयाची झालेली दूरवस्था

**(३९) * ४३४२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी पूर्वेकडील एमआयडीसी परिसरातील कामगार रुग्णालयामध्ये आवश्यक सोयीसुविधा आणि योग्य औषधोपचारही सर्वसामान्य रुग्णांना मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय निदर्शनास आले व शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्य कामगार विमा महामंडळ, आदर्श रुग्णालय, अंधेरी हे रुग्णालय केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालय यांच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित असून सदर रुग्णालयाच्या सर्व कामकाजावर राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांचे नियंत्रण आहे. सदर रुग्णालय राज्य शासनाच्या अखत्यारित नाही. तथापि आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांना या प्रकरणी संबंधितांकडून माहिती घेऊन आवश्यक तो पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरा (ता.जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरींचे अनुदान अदा करण्याबाबत

**(४०) * ४३७३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरा (ता.जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांनी दोन वर्षापूर्वी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरीचे काम पूर्ण करुनही त्यांना मावेजा अद्याप मिळाला नसल्याने सदरहू १६ शेतकऱ्यांनी सामुहिक आत्महत्या करण्याचा इशारा निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्र्यांना दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतून काही ठिकाणी गैरव्यवहार झाला असून नियमानुसार हजेरीपत्रक भरल्यानंतरही विहिरीचे अनुदान मंजुर करण्यास प्रशासन विलंब करत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) मौजे उमरा ता.लोहा जि.नांदेड येथील १६ शेतक-यांनी सामुहिक आत्महत्या करण्याचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ०२ जानेवारी, २०१५ च्या पत्रान्वये सादर केले आहे.

(२) मौजे उमरा ता.लोहा जि. नांदेड या गावात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी नाहीत. नियमानुसार सर्व हजेरीपत्रक भरून अकुशल देयके अदा करण्यात आली आहेत. परंतु सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या अर्थिक वर्षातील १६ सिंचन विहिरींचे कुशल देयके प्रलंबित आहेत.

(३) प्रलंबित कुशल देयके अदा करण्यासाठी शासन परिपत्रक दिनांक ९ मे, २०१४ अन्वये कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**निवघा बाजार (ता.हदगांव, जि.नांदेड) येथे रोजगार हमी योजनेंतर्गत कामे केलेल्या मजूरांना मोबदला मिळण्याबाबत**

**(४१) * ४४७८ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवघा बाजार (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्षसंगोपनाची कामे केलेल्या मजुरांना गेल्या आठ महिन्यापासून कामाचा मोबदला मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील आठ महिन्यापासून कामाचा मोबदला मिळाला नसल्याने सदरहू मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खडकवासला (जि.पुणे) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(४२) * ४६३० डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (पुणे) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्यास शासनाने मंजुरी देऊन तसेच कोटयवधी रुपयांचा निधी देऊनही गेल्या दोन वर्षापासून सदर रुग्णालयाचे काम सुरु झाले नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची मंजूरी व निधी उपलब्ध करुनही सदरच्या रुग्णालयाचे काम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यांस जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे. दिनांक १७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये खडकवासला (जिल्हा पुणे) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(२) रुग्णालयास आवश्यक असलेल्या पुरेश्या जागेअभावी अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्यात आलेले नसल्याने निधी उपलब्ध करुन देता आलेला नाही. जागा उपलब्ध होणेबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील क्षय रुग्णांसाठी आवश्यक असलेली औषधे उपलब्ध करण्याबाबत**

**(४३) * ४९६८ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील क्षय रुग्णालयात क्षय रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने आवश्यक औषधांचा मात्र तुटवडा असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बाल क्षयरुग्णांना अत्यंत आवश्यक असलेल्या पीसी-१३ पीसी-१४ या औषधांचा तुटवडा झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने औषधे उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्यात सन २०१२ मध्ये १,३६,०४५ क्षयरुग्ण, २०१३ मध्ये १,३७,३२० क्षयरुग्ण आणि २०१४ मध्ये १,३५,४६५ क्षयरुग्ण आढळून आले आहेत. ही आकडेवारी पाहता क्षयरुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे असे दिसून येत नाही. क्षयरोग प्रतिबंधक कॅट-१ व कॅट-२ औषधे केंद्र शासनाकडून प्राप्त होतात. सद्यस्थितीत या औषधांचा राज्यात तुटवडा नाही.

(२) हे अंशत:खरे आहे.

बाल क्षयरुग्णांना देण्यात येणारी पीसी-१३ आणि पीसी-१४ ही औषधे केंद्र शासनाकडून मोफत उपलब्ध होतात. सद्य:स्थितीत राज्यात पीसी-१३ चे १३९६ बॉक्स आणि पीसी-१४ चे ५३५४ बॉक्स उपलब्ध आहेत. पीसी-१४ या औषधांचा राज्यात तुटवडा नाही. मात्र पीसी-१३ या औषधाची आवश्यकता आहे.

(३) राज्य शासनाने केंद्र शासनास केलेल्या पाठपुराव्यामुळे केंद्र शासनाकडून कॅट-१ चे ६८०० बॉक्स, कॅट-२ चे २१६० बॉक्स, पीसी-१४ चे ४० बॉक्स, पीसी-१५ चे १८० बॉक्स व पीसी-१६ चे २२० बॉक्स इतकी क्षयरोग प्रतिबंधक औषधे प्राप्त झालेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाडयातील जलसंवर्धनाची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(४४) * ५४४६ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात नेहमीच पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे तसेच पाण्याचा उपसा दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे जलसंवर्धनाच्या कामाकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे मराठवाडा विद्यापीठातील भुशास्त्रतज्ञ व बीसीयुडी संचालक यांनी सूचित केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्याचे वाळवंट होऊ नये यासाठी जलसंवर्धनाच्या कामाकडे विशेष लक्ष देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील बीसीयुडी संचालक (बोर्ड ऑफ कॉलेज ॲण्ड युनिवर्सिटी डेव्हलपमेंट) अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएनएस) समन्वयक (कोऑर्डिनेटर) यांनी विद्यापीठातंर्गत असणा-या सर्व महाविद्यालयांना जलसंवर्धनाबाबत शिबीर आयोजन करण्याबाबत पत्राने कळविले आहे

(२) विद्यापीठातंर्गत असणा-या २२० महाविद्यालयांमध्ये जलसंवर्धनाबाबत शिबीर आयोजन करण्यात येत आहे.

सन १९९२-९३ ते मार्च २०१३-१४ या कालावधीत मराठवाड्यातील ३२.५८ लाख हेक्टर उपचारीत करण्यात आले आहे. सन २००५-०६ पासून मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत मराठवाडा पाणलोट विकास मिशन राबविण्यात आले होते. मराठवाडा विभागात केंद्र व राज्य योजनाद्वारे माती नालाबांध सिमेंट नाला बांध शेततळे, वळण बंधारे इत्यादी उपचार करण्यात आले असून त्या द्वारे १.९३ लाख हेक्टर अप्रत्यक्षरित्या सिंचनाखाली आले आहे.

तसेच जलयुक्त शिवार अभियानांर्तगत मराठवाड्यातील १६८२ गावे निवडण्यात आली असून सन २०१५-१६ करिता जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत २८० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात १ हजार रुग्णांना दूषित रक्त पुरवठयामुळे एचआयव्हीची झालेली लागण**

**(४५) * ५५३१ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील पाच वर्षात १ हजारहून अधिक रुग्णांना दूषित रक्तपुरवठा झाल्यामुळे एचआयव्ही लागण झाल्याची बाब दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने रक्ताची देवाण-घेवाण प्रक्रियेमध्ये अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) रक्तसंक्रमणामुळे एचआयव्ही संसर्ग या सदराखाली दि. २९ व ३० जानेवारी, २०१५ रोजी टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) होय.

एचआयव्ही आणि एचआयव्ही संबंधित रुग्णांबद्दल समाजात असलेला कलंकित दृष्टीकोन आणि भेदभाव लक्षात घेता एचआयव्ही बाधित रुग्ण त्यांना झालेली लागण ही रक्तसंक्रमणातून झाल्याची कारणे देतात. मात्र प्रत्यक्षात एचआयव्ही कशामुळे झाला हे सिध्द करु शकत नाही किंवा हे सिध्द करण्याची कोणतीही प्रणाली उपलब्ध नाही. त्यामुळे वृत्तपत्रात प्रकाशित झालेली माहिती पूर्णपणे खरी असेलच अशी ग्वाही देता येत नाही.

राज्यात पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक आणि मुंबई या ठिकाणी न्यूक्लियक ॲसिड टेस्टिंग केंद्र उभारण्याकरिता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत तयार केलेला प्रस्ताव राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्याकडून केंद्र शासनास मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. केंद्राकडून मंजूरी मिळताच ही योजना राज्यात राबविण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### गडचिरोली जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या बदलीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४६) * ५६०१ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते : दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी उत्तरीत झालेला ता.प्र.क्र. ११०० च्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या बोगस बदली झाल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनास पत्र पाठवून दोषी असलेल्या कर्मचारी अधिका-यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी तालुका निहाय बदली झालेल्या शिक्षकांची माहिती गोळा करुन आयुक्तालयामार्फत मंत्रालयात अहवाल पाठविला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. (गडचिरोली जिल्हा परिषदेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याची बाब माहे एप्रिल/मे २०१४ मध्ये निदर्शनास आली आहे.)

(२) लोकप्रतिनिधींकडून यासंदर्भात निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३), (४) व (५) होय, विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

### राज्यातील कुष्ठरोगाचे कायमस्वरुपी निर्मुलन करण्याबाबत

**(४७) * ५७६९ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ मध्ये आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणात राज्यात १६ हजार नवे कुष्ठरोगी आढळले आहेत यात तब्बल १३०० (१२.७०) बालकांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सर्व मुले ७ ते १२ या वयोगटातील असून चंद्रपूर, गडचिरोली, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयात ही मुले आढळल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लहान मुलांमध्ये कुष्ठरोग आढळणे वैद्यकीय क्षेत्रात गंभीर बाब समजली जात असल्याने राज्यातील कुष्ठरोगाचे कायमस्वरुपी निर्मुलन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम सन १९५५-५६ पासून अव्याहतपणे राबविण्यात येत आहे. कुष्ठरोगावर प्रतिबंधकात्मक व उपचारात्मक अशी एकमेव बहुविध औषधोपचार पध्दतीच उपलब्ध असल्याने कुष्ठरोग कार्यक्रमात जास्तीत जास्त नवीन कुष्ठरुग्ण शोधून उपचाराखाली आणण्यावर भर देण्यात येत आहे. नवीन कुष्ठरुग्ण सर्वसाधारण आरोग्य कर्मचा-यांमार्फत शोधले जातात. आरोग्य कर्मचारी संशयित कुष्ठरुग्ण शोधून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिका-यांकडे निदान निश्चितीकरीता पाठवितात. वैद्यकीय अधिका-यांनी निदान निश्चिती ७ दिवसांच्या आत करणे अपेक्षित आहे. तसेच नवीन कुष्ठरुग्णांना अप्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे वैद्यकीय अधिकारी बाह्यरूग्ण तपासणीमध्ये शोधतात. कुष्ठरोगाचे निदाननिश्चिती झाल्यावर कुष्ठरुग्णांना त्वरीत बहुविध औषधोपचाराखाली रोगप्रकारानुसार आणले जाते. (असांसर्गिक ६ महिने व सांसर्गिक १२ महिने) औषधोपचार सुरु झाल्यावर रोगाचा प्रसार थांबण्यास मदत होते.

त्यानुसार राज्यात ऑक्टोबर, २०१३ व जानेवारी, २०१४ या महिन्यांमध्ये विशेष सर्वेक्षण मोहिम घेण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये एकूण १२६४ नवीन कुष्ठरुग्ण शोधण्यात आले असून त्यात २१६ लहान मुलांचा समावेश आहे.

त्यापैकी चंद्रपूर जिल्ह्यात ७, गडचिरोली जिल्ह्यात ६, रत्नागिरी जिल्ह्यात ० व सिंधुदुर्ग जिल्ह्यात १ मुलगा आढळून आला आहे. ही सर्व मुले १-१४ या वयोगटातील आहेत.

वरील कुष्ठरुग्णांना त्वरीत बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात येऊन सदर रुग्णांनी औषधोपचार पूर्ण केलेला आहे.

(३) राज्यातील कुष्ठरोगाचे कायमस्वरुपी निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दरवर्षी विविध आरोग्य शिक्षण, जनजागृती कार्यक्रम, सर्वसाधारण आरोग्य कर्मचा-यांमार्फत नियमित भेटीद्वारे कुष्ठरोगाबाबतच्या संशयितांची तपासणी व वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत निदान निश्चिती केली जाते. तसेच दरवर्षी विशेष कुष्ठरोग शोधमोहिमेचे आयोजन केले जाते. यातून शोधण्यात आलेल्या नवीन कुष्ठरुग्णांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील "टेली मेडिसिन"आरोग्यसेवा सुरू करण्याबाबत

**(४८) * ३०२६ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील आरोग्यसेवा शहरी भागाप्रमाणे दर्जेदार करण्याच्यादृष्टिने "टेली मेडिसिन" सेवा अमरावती जिल्ह्यातील मेळघाटपासून सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रश्नाबाबत निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात सन २००९-१० पासून जिल्हा रुग्णालयात व सन २०११-१२ पासून मेळघाट परिसरातील उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे टेलिमेडिसीन सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच माहे फेब्रुवारी २०१५ पासमन मेळघाटातील सेमाडोह जि. अमरावती येथुन आत्याधुनिक पध्दतीची टकलिमेडीसीन सेवा प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## असरअल्ली (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) येथे वैद्‌यकीय उपचाराअभावी बालकांचा झालेला मृत्यू

**(४९) * २६५७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) असरअल्ली (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) येथील आदिवासी कुटूंबातील गगुरी दुर्गेया महिलेने जन्म दिलेली दोन्ही जुळी बालके वैद्‌यकीय उपचारांअभावी दगावल्याची घटना दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिरोंचा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर व रुग्णवाहिका नसल्यानेच या बालकांना उपचार न मिळून त्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधांचा तुटवडा, डॉक्टर, परिचारीका व वैद्‌यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे असणे, त्यामुळे या भागत बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशी नुसार दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २३.१२.२०१४ रोजी मौजे असरअल्ली गावातील श्रीमती सारक्का सदन्या गुगरी या ७ महिन्याच्या गरोदर महिलेने जन्म दिलेल्या जुळया बालकांवर प्राथमिक आरोग्य पथक, असरअल्ली व प्राथमिक आरोग्य केंद्र, अंकिसा येथे उपचार करण्यात आलेले होते.

बालकांचे मृत्यू दिनांक २६.१२.२०१४ रोजी झाले असून, सदरचे मृत्यू प्राथमिक आरोग्य केंद्रातील सोयीसुवीधा अभावी न होता बालके कमी वजनाची व कमी दिवसांची असल्याकारणाने झालेले आहेत.

(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य पथक, असरअल्ली येथून प्राथमिक आरोग्य केंद्र, अंकिसा व प्राथमिक आरोग्य केंद्र, अंकिसा येथून ग्रामीण रुग्णालय, सिरोंचा येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिकेने संदर्भित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे ग्रामीण रुग्णालय, सिरोंचा येथून उपजिल्हा रुग्णालय, अहेरी येथे १०८ च्या रुग्णवाहिकेने संदर्भित केले. तद्नंतर एका बालकास जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे १०८ च्या रुग्णवाहिकेने संदर्भ सेवा देण्यात आली. त्याप्रमाणे पुढील उपचारासाठी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर येथे पाठविण्याकरिता ही १०८ रुग्णवाहीकेने संदर्भित करण्यात आले.

(३) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, अंकिसा येथे मंजूर असलेल्या एकूण १६ पदांपैकी वैद्यकिय अधिका-यांच्या वर्ग-२ मधील गट-अ व गट-ब च्या पदांसहीत १४ पदे भरलेली आहेत. तसेच सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अत्यावश्यक औषधांचा तुटवडा नाही. या प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत एकूण ११ उपकेंद्रातील एकूण ४०२५ बालकांपैकी ९ बालके सॅम व ६५ बालके मॅम प्रकारची आहेत.

(४) आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पाच्या रुग्णवाहिकेकडून सेवा देताना काही त्रुटी राहिल्या आहेत किंवा कसे याची चौकशी सुरु आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या**
**संगणक परिचालकांना मानधन अदा करण्याबाबत**

**(५०) * ३५६९ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, डॉ.सुधीर तांबे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ३०५ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यामध्ये असलेल्या १२०७ ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांना रुपये ८००० मानधन असताना अतिअल्प मानधन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाऑनलाईन कंपनीने संगणक परिचालकांना केवळ ४ हजार रुपये प्रतिमाह वेतन दिल्यामुळे तसेच त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी राज्यातील २७ हजार ग्रामपंचायतीमधील संगणकपरिचालकांनी दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंदोलनकर्त्या परिचालकांविरुध्द कंपनीने कार्यवाही करुन अनेकांचे ऑनलाईन अकाऊंट बंद केल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार संगणक परिचारकांना पूर्ण मानधन देणेबाबत तसेच जिल्हाभरातील ग्रामपंचायतीतील परिचारकांची नोंद ठेवणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(६) असल्यास, २० हजार कंत्राटी परिचालकांवर अन्याय करणाऱ्या आणि अर्धवट वेतनात काम करुन घेणाऱ्या महाऑनलाईन कंपनीविरुध्द शासन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) महाऑनलाईनला ग्रामपंचायतीतुन देण्यात येणारे ८०००/-+ सेवाकर हे फक्त संगणक परिचालकांचा (VLE च्या) मोबदल्यासाठी नाही. यामध्ये संगणक परिचालकांचा मोबदला तसेच प्रशिक्षण बैठका, आज्ञावली विकसन, कागद, टोनर, इत्यादी कन्झ्युमेबल, सर्व प्रकारचे तांत्रिक व तंत्रज्ञान सहाय्य व्यवस्थापन या सर्व खर्चाच्या बाबीसाठी एकत्रित आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) ज्या संगणक परिचालकांनी त्यांना दिलेली (डेटा एन्ट्री) ची उददीष्ट कार्यपुर्ती तीन महिन्याच्या कालावधीत पुर्ण केली नाही अशा संगणक परिचालकांच्या सेवा त्यांच्या करारनाम्यानुसार खंडित करण्यात आल्या होत्या. ज्या संगणक परिचालकांनी आक्टोंबर ते डिसेंबर २०१४ या त्रैमासिक कालावधीत त्यांना दिलेल्या उदिदष्टपुर्तीच्या केवळ ० ते २० % इतकेच काम पुर्ण केले होते. अशा VLE ची सेवा करार संपुष्टात आणण्यात आले होते. तथापि काम करण्यास इच्छूक असलेल्या VLE ना पुर्नस्थापित करण्याबाबत विभागाने महाऑनलाईनला कळविले आहे. VLE कार्यरत असून उदिदष्टपुर्ती नुसार काम करतात किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांना सुध्दा दिलेली आहे. तसेच १ जानेवारी, २०१५ पासुन ३१ मार्च, २०१५ पर्यत संगणक परिचालकांना उदिदष्टानुसार अदा करावयाचे मानधन व या अनुषंगिक बाबी यांच्या सुस्पष्ट मार्गदर्शक सुचना दि २६ एप्रिल, २०११ व ३ मार्च, २०१५ च्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाला लागणारी जमीन त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५१) * २६७५ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाला जवळपास ३०० एकर जमिनीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चामोर्शी मार्गावरील ३०० एकर जमिनीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच प्रधान मुख्य वन संरक्षकांनी सकारात्मक अभिप्रायासह विद्यापीठाकरिता १८४ एकर जमीन देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावांबाबत शासन तात्काळ दखल घेऊन जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) गोंडवाना विद्यापीठाकरीता गडचिरोली जिल्ह्यातील १६०.०६ हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे दिनांक २१/०९/२०१३ रांजीचया पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केला होता. सदर पत्रात त्यांनी प्रस्तुत प्रस्ताव नामंजुर करण्याची शिफारस केली होती. प्रस्तुत प्रकरणाचा सर्वेकष विचार करून राज्य शासनाने गोंडवाना विद्यापीठाकरीता वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास शिफारस न करण्याचा निर्णय घेतला होता. तथापि, याबाबत पुनर्विचार करण्यात येत आहे.

-----------------

**मौजे दिवठाणा, ता.खामगांव (जि.बुलडाणा) येथील जमिन लघु प्रकल्पासाठी बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत**

**(५२) * ४०३४ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ९१५ ला दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव, तालुक्यातील (जि.बुलडाणा) निमकवळा शिवारात ज्ञानगंगा नदीवर निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्प नावाचे छोटे धरण बांधण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणासाठी निमकवळा, काळेगांव, दिवठाणा व वर्णा येथील शेतकऱ्यांची जमिन संपादित करण्यात आली असून आतापर्यन्त प्रकल्पासाठी बाधित क्षेत्रापैकी १२७ हेक्टर जमिन पाटबंधारे विभागाने सरळ खरेदी करून संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या ४ गांवापैकी ३ गावांची शेतजमिन बाजारभावाप्रमाणे (सुमारे १० लाख रूपये किंमतीने) सरळ खरेदी व्यवहाराने संपादित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दिवठाणा येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे भू-संपादन बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत शासनाने मंजुरी दिलेली असतांनाही अद्यापपर्यन्त या गावातील शेतजमिन संपादित केलेली नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या गावांतील शेतजमिनीचे संपादन जुन्या भू-संपादन कायद्याप्रमाणे संपादित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे सादर केल्यामुळे या गांवातील भू-संपादनाची प्रक्रिया बंद असल्यामुळे प्रकल्पाचे कामही बंद आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, मौजे दिवठाणा व गावांतील शेतजमिन बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) अंशतः खरे आहे. मौजे काळेगांव, निमकवळा व रोहणा येथील एकूण १२७.७६ हे. जमीन सरळ खरेदीने संपादित केलेली आहे.
(३) होय, जमीनीच्या सरळ खरेदीचा सरासरी दर रु. ९.६२ लक्ष प्रति हे. एवढा आहे.
(४) नाही,
दिवठाणा येथील शेतक-यांनी शेतजमिनीचे भुसंपादन नविन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला देऊन करण्यातबाबत अर्ज दिल्यामुळे सरळ खरेदीने जमिन संपादित करता आलेली नाही.
(५) नाही, भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी,बुलढाणा यांना सादर करण्यांत आलेला आहे. प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
(६) दिवठाणा येथील जमिन भूसंपादन प्रस्ताव प्रारुप निवाडा स्तरावर असुन जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेमार्फत अंतीम निवाडा झाल्यावर संबंधीत शेतक-यांना मोबदला अदा करण्यात येईल.

-----------------

## मौजे भाटसांगवी ता.जि.बीड ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तीक जलसिंचन विहिरीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५३) * ३६४६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भाटसांगवी ता.जि.बीड ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तीक जलसिंचन विहिरीच्या कामात गैरव्यवहार झाल्याची तक्रार दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांना देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास तक्रारी दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सरपंच, ग्रामसेवक व इतर यांनी संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) श्री प्रल्हाद श्रीपती बोरवडे मौजे भाटसांगवी ता.जि.बीड यांची दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजीची तक्रार प्राप्त झालेली आहे.
(२) सन्माननीय विधान परिषद सदस्य यांची दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजीची तक्रार प्राप्त झालेली आहे.
(३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ च्या अहवालानुसार प्रश्न भाग १ मधील तक्रारीत काही तथ्य नाही असे दिसून येते. प्रश्न भाग २ मधील तक्रारीतील इतर बाबींच्या अनुषंगाने मौजे भाटसांगवी ता.जि. बीड येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाची तपासणी करण्यासाठी गटविकास अधिकारी यांच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ च्या आदेशान्वये तीन चौकशी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

-----------------

**कोकणातील समुद्रालगत व खाडीकिनारी असलेल्या शेतजमिनीच्या**
**सातबारा उताऱ्यातील नोंदीबाबत**

**(५४) * ३८७३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकाणातील समुद्र तसेच खाडीकिनारी असलेल्या शेत जमीनीच्या ७/१२ उताऱ्यातील इतर हक्कात खारभूमी पुर्नप्रापित लाभक्षेत्र अशी नोंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता हे खरे आहे काय,
(२) या निर्णयानुसार या जमिनीचे सन २००३ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या जमिनीचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे काय,
(४) असल्यास, शासन या प्रकरणी पुढील कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन :** (१) खारभूमी विकास अधिनियम १९७९ मधील कलम १२(१) मधील तरतुदीनुसार खारभूमी योजना अंमलात आल्यानंतर या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जमिनी खार जमीन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत, अशा आशयाची नोंद अशा जमिनींशी संबंधित असलेल्या अधिकार अभिलेखामध्ये करणेविषयी सूचीत केले आहे.

(२) नाही, तथापि, खारभूमी विकास अधिनियम १९७९ मधील कलम १२(१) नुसार खारभूमी योजना पूर्ण झाल्यानंतर पुर्नप्रापित क्षेत्राचा तपशिल राजपत्रात प्रसिध्द केल्यानंतर ७/१२ उता-यातील इतर हक्कात खार जमीन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत अशा आशयाची नोंद घेण्याविषयी महसूल विभागाला कळविण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) पूर्ण झालेल्या खारभूमी योजनांच्या बाबतीत ७/१२ मधील इतर हक्कामध्ये नोंद घेण्याबाबत महसूल विभागास कळविण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हा परिषदेच्या अपंग प्रवर्गातील प्राथमिक शिक्षकांना**
**विशेष अनुदानापासून वंचित ठेवल्याबाबत**

**(५५) * ३२६८ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २० जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार अपंग कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेच्या सुमारे १०४ शिक्षकांनी सदर योजने अंतर्गत २ वर्षापूर्वी प्रस्ताव सादर केले आहेत, हे खरे आहे काय,
(३) या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी अपंग शिक्षकांच्या प्रस्तावानुसार संबंधित शिक्षकांना सहाय्यक अनुदान केव्हा देण्यात आले आहे,
(४) नसल्यास, अपंग शिक्षकांना जाणीवपूर्वक या लाभापासून वंचित ठेवण्याची व त्यांची क्रुर चेष्टा करण्याची कारणे काय आहेत,
(५) अपंग शिक्षकांना शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे अथवा करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) सद्यस्थितीत ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील १०४ अपंग प्राथमिक शिक्षक कर्मचाऱ्यांना सहायक उपकरणे/तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आर्थिक तरतूद उपलब्ध करून देयके मंजुरीस्तव कोषागरास सादर करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिका/नगरपंचायती स्थापन करण्याबाबत**

**(५६) * ५२४३ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ८२८ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये अग्निशामक व आपत्कालीन सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावांतर्गत सद्यस्थितीत राज्यातील १३८ तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिका/नगर पंचायती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(३) नसल्यास, प्रस्तुत कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर कार्यवाही ग्रामविकास विभाग व नगर विकास विभाग अशा दोन विभागांच्या स्तरावर करण्यात येत असून, ती प्रगतीपथावर आहे.

-----------------

**बाभूळगाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) एमआरइजीएसच्या कामात**
**लाखो रुपयांचा अपहार झाल्याबाबत**

**(५७) * ३४५० श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभूळगाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) एमआरइजीएसच्या कामात लाखो रुपयांचा अपहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एमआरइजीएसच्या कामात अपहार करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येते आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी ग्राम पंचायत चिमनापूर येथील मग्रारोहयोच्या झालेल्या कामाबाबत तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी दिलेल्या निर्देशनानुसार स्थापन केलेल्या चौकशी समिती मार्फत प्रकरणाची चौकशी करण्यात आली.

चौकशी समितीस सकृत दर्शनी अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. याप्रकरणी मुख्यत्वे जबाबदार असलेल्या ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणाच्या संपुर्ण दस्तऐवजाची तपासणी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू तालुक्यात (जि.पालघर) व मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे**
**डासांमुळे साथीचे आजार वाढत असल्याबाबत**

**(५८) * ४०६५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू तालुक्यात (जि.पालघर) पश्चिम भागातील गावांमध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढत असून दरवर्षी या परिसरात डेंग्यूचे रुग्ण वाढत असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे १६५ जणांना मलेरिया तर १५ जणांना डेंग्युचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने या परिसरात मलेरिया व डेंग्यूच्या साथीला आळा घालण्यासाठी आरोग्य विभागाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) माहे डिसेंबर, २०१४ मध्ये मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे मलेरियाचे १४ व डेंग्यूचे ५ रुग्ण आढळून आले आहेत.
(३) होय.
(४) राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यू व मलेरिया नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हयात खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात आल्या व येत आहेत.

- आरोग्य कर्मचा-यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.
- उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण.
- तापरुग्णांचे रक्तनमूने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी.
- तपासणीअंती आढळून आलेल्या हिवताप रुग्णांना जंतूच्या प्रकारानुसार त्यांचा समूळ उपचार.
- डेंग्यू तापाच्या निदानासाठी जिल्हा रुग्णालय ठाणे येथे व्यवस्था.
- रुग्ण व्यवस्थापन.

- गप्पी मासे पैदास केंद्रे कार्यरत असून जिल्ह्यातील डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे.
- हिवताप उद्रेकग्रस्त भागात तसेच हिवतापासाठी अतिसंवेदनशील निवडक गावांमध्ये किटकनाशकांची घरोघरी फवारणी.
- किटकशास्त्रीय सर्वेक्षणांतर्गत पाणीसाठ्यांची तपासणी, डास अळ्या आढळून आलेले पाणीसाठे रिकामे करणे व रिकामे करता न येणा-या पाणीसाठ्यामध्ये टेमिफॉस ५० टक्के ई.सी.अळी नाशकाचा योग्य त्याप्रमाणात वापर.
- डेंग्यू उद्रेकग्रस्त गावात किटकनाशकाची धुरफवारणी.
- शासकीय आरोग्य संस्थांना आवश्यक तो औषधांचा पुरेसा पुरवठा तसेच जिल्ह्यांना किटकनाशके, अळी नाशके व साहित्यसामग्रीचा पुरवठा.
- उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/विभागीय अधिका-यांच्या भेटी.
- विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील २५ लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(५९) * ३७९३ श्री.विजय गिरकर, श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात सरासरी ३,१४२ मि.मी. पाऊस पडला असला तरी एकूण पाऊस ७० टक्के असून धरणातील पाणीसाठा जानेवारीमध्येच ५० टक्क्यांवर आल्याने रायगड जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांच्या संख्येत २० टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नवी मुंबई आणि मुंबईला पाणी पुरविणारा रायगड जिल्हा पाणी टंचाईग्रस्त राहिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील २५ लघु पाटबंधारे अपुऱ्या अवस्थेत राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर २५ लघु पाटबंधारे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही, रायगड जिल्ह्यात ३१ लघु पाटबंधारे योजना पूर्ण झालेल्या असून ६ ल.पा. योजनांची कामे प्रगती पथावर आहेत.

(४) ६ लपा योजनांची भूसंपादनाची व पुनर्वसनाबाबतची कार्यवाही पूर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार योजना पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**भिवंडी येथील स्व.इंदिरा गांधी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतन व समावेशनाबाबत**

**(६०) * ३५२४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे स्वर्गिय इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय माहे ऑक्टोबर, २०११ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे वर्ग करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासन व संबंधित महानगरपालिका यांचेमध्ये झालेल्या अटी व करारनाम्यानुसार सदर रुग्णालयातील एकूण ४३ अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाने सेवेत म्हणजे सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये समाविष्ट करून घेणे बंधनकारक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ४३ कर्मचाऱ्यांना आरोग्य विभागाने अद्याप समाविष्ट करून न घेतल्याने भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेने माहे जून, २०१४ पासून त्यांचे वेतन देणे बंद केल्याने आरोग्य विभागात समाविष्ट करण्याबाबत या ४३ कर्मचाऱ्यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री व संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे गेल्या तीन वर्षांपासून आतापावेतो अनेकदा लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(४) प्रश्नाधिन ४३ अधिकारी/कर्मचाऱ्यांना ३ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही अद्याप समाविष्ट न करण्याची कारणे काय आहेत, त्यास जबाबदार कोण व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) भिवंडी-निजामापूर महानगर पालिकेचे स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय दिनांक ०८.०२.२०११ रोजी शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. रुग्णालयातील कर्मचारी महानगर पालिकेचे कर्मचारी होते. शासन सेवेत कर्मचा-यांचे समावेशन होणे ही शासन धोरणाप्रमाणे अस्तित्वात असलेल्या नियम व शर्थीनुसार होणारी प्रक्रिया आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेनुसार दिनांक ३०.०१.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये त्यांचे सामवशेन शासन सेवेत झाल्याने तेव्हापासूनचे वेतन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

शासन सेवेत त्यांचे समावेशन करण्याच्या दिनांकापूर्वी ते महानगर पालिकेचे कर्मचारी होते त्यामुळे त्यांचे वेतन व भत्ते महानगर पालिकेने देणे अभिप्रेत असल्याने योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील इंदिरा आवास योजनेंतर्गत अपूर्ण अवस्थेतील घरकुलांचे बांधकाम**

**(६१) * २९२४ श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३-१४ या वर्षात इंदिरा आवास योजने अंतर्गत १ लाख ५२ हजार २५४ घरकूल मंजूर होवून त्यापैकी ९३ हजार ९६६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण होवून ५८ हजार २९२ घरकुलांचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात विशेषत: अकोला येथे इंदिरा आवास योजनेत लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्याच्या संथगतीमुळे या योजनेचे सुमारे ३१७ कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिल्याने राज्यात घरकुलापासून खरे लाभार्थी अद्यापी वंचित असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना संथगतीने व विलंबाने राबविणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर घरकुलांचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात राज्यास १,३७,३१४ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. मार्च,२०१४ अखेर १,४६,९४७ घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून मार्च, २०१४ अखेर १,२८,१३५ घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

अकोला जिल्हयास सन २०१३-१४ मध्ये ४३९८ चे उद्दिष्ट होते. त्यापैकी सद्यस्थितीत २९३६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित १४६२ घरकुलांची बांधकाम प्रगती पथावर आहेत. सदरचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी रु.४१७८.१० लक्ष निधी प्राप्त झाला आहे. त्यापैकी प्रगती पथावरील घरकुलांसाठीचा रु.५९३.७० लक्ष निधी अखर्चित आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माळढोक पक्षाचे अस्तित्व धोक्यात आल्याने वरोरा-भद्रावती क्षेत्रातील पक्षी प्रेमी संघटनेनी छायाचित्रकारांच्या गर्दीवर प्रतिबंध घातण्याबाबत**

**(६२) * ४१५० प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा-भद्रावती क्षेत्रातील गावालगत व शेतशिवारात आढळणारा व सन २०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन मंडळाच्या अत्यंत दुर्मिळ पक्षांच्या यादीमध्ये समावेश असलेल्या माळढोक पक्षाचे अस्तित्व विदर्भातील हौशी छायाचित्रकारांच्या वाढत्या गर्दीमुळे धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पक्षी प्रेमी संघटनेनी छायाचित्रकारांच्या गर्दीवर प्रतिबंध करण्याची मागणी शासनाकडे केली असतानाही त्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पक्षाचे अस्तित्व अबाधित राखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) माळढोक पक्षाचा वावर असलेल्या क्षेत्रामध्ये त्यंना मुक्तपणे संचार करता यावा यासाठी नजीकच्या शेतक-यांना माळढोक पक्षाचे महत्व पटवून देण्यात आलेले आहे. ज्या भागात माळढोक पक्षी आढळतात तेथील गावात इको-डेव्हलपमेंट समिती स्थापन करून माळढोक पक्षाचे संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे. तसेच चर्चासत्राचे अयोजन करण्यात येते.

या कामी निसर्गप्रेमी, अशासकीय संस्था, शाळा, महाविद्यालय, संयुक्त वन व्यवस्थापन समित्या इत्यादिंचा सहभाग घेण्यात येतो. माळढोक अस्तित्व असलेले क्षेत्र संरक्षणाच्या दृष्टीने माळढोक संरक्षण आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी धरण प्रकल्पावर काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(६३) * ३०९३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी धरण प्रकल्पावर गेली ३० वर्ष काम करणाऱ्या ५२ कंत्राटी कामगारांना माहे १ जानेवारीपासून संस्था स्थापन करून प्रकल्प कामावर सामावून घेण्याचे आश्वासन शासनाने प्रकल्प अधिकाऱ्यांना दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटी कामगारांना अद्यापपर्यंत सामावून न घेता, त्यांचा ९ महिन्यांचा पगारही रोखण्यात आल्याने त्यांचेवर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास कंत्राटी कामगारांना प्रकल्प कामावर सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
सदर कामगारांना ते शासनाच्या सेवेत नसल्याने शासनातर्फे पगार दिला जात नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील कामगार विमा योजना रुग्णालयातील परिचारिकांची मंजूर पदे तातडीने भरणेबाबत**

**(६४) * ३८३८ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोमवारी पेठ (नागपूर) येथील कामगार विमा योजनेच्या रुग्णालयात ५५ परिचारीकांची गरज असताना केवळ २६ परिचारिकांवर रुग्णलयाचा कारभार चालत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंजूर पदे न भरण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच रुग्णांना पूर्ण क्षमतेने आरोग्य सेवा मिळावी म्हणून सदर रुग्णालयातील परिचारकांची मंजूर पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.
(२) राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ४-८-२०१० रोजी झालेल्या बैठकीमध्ये, राज्य कामगार विमा योजना, केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या अधिनस्थ असलेल्या कामगार राज्य विमा महामंडळाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुषंगाने कामगार राज्य विमा महामंडळाकडून सदर निर्णयाची अंमलबजावणी प्रलंबित असल्यामुळे पदभरती होऊ शकलेली नाही.
(३) योजनेचे हस्तांतरण करण्याबाबत राज्य शासनाकडून पाठपुरावा करुनही, कामगार राज्य विमा महामंडळाकडे योजनेचे हस्तांतरण प्रलंबित असल्यामुळे भरतीची प्रक्रिया होऊ शकलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: कल्याण तालुक्यात सावित्रीबाई कन्या योजना राबविण्याबाबत

**(६५) * २७३५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींचे प्रमाण एक हजारास ९४६ इतके असल्यामुळे मुलींचे प्रमाण वाढावे, कन्यारत्नाचे ओझे आईवडीलांना, कुटुंबीयांना वाटू नये, तिच्या शिक्षणाची व किमान लग्नाच्या खर्चाची तरतूद करता यावी म्हणून शासनाने सावित्रीबाई कन्या योजना सुरु केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात तसेच कल्याण (जि.ठाणे) तालुक्यात गेल्या वर्षभरात एकही लाभार्थी नसल्याने सावित्रीबाई कन्या योजनेचा बोजवारा उडाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सदरची योजना सक्षमपणे राबविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

शासनाने दारिद्रेरेषेखालील जोडप्यांना मुलगा नसताना त्यांनी एक अथवा दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेतल्यास त्यांच्या मुली/मुलींकरीता विशेष प्रोत्साहन योजना म्हणून शासन निर्णय क्रमांक - साफुयो - २००४/१५११/प्र.क्र.२९७/कु.क ३ दि.२४ एप्रिल २००७ नुसार राज्यात सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना सुरु केली आहे.

(२) राज्यात सन २०१४-१५ मध्ये एकुण ८१३ लाभार्थी आहेत. यापैकी ठाणे जिल्हयातील कल्याण तालुक्यात एकही लाभार्थीचा समावेश नाही.

(३) गावपातळीवर आरोग्य सेवक/सेविका, आशा, आंगणवाडी कर्मचारी इ.मार्फत लाभार्थ्यांना घरभेटीद्वारे योजनेची माहिति प्रत्यक्ष दिली जाते. तसेच सदर बाबतचे प्रस्ताव वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्रे यांचेमार्फत जिल्हास्तरावर पाठविले जातात व पात्र लाभार्थ्यांना अनुज्ञेय लाभ दिला जातो.

(४) प्रश्प उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे भागात पेरणी सुरु असतानाच कालव्यांची साफसफाई करण्यात आल्याबाबत**

**(६६) * ४४३६ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे भागात रब्बीच्या पिकाचे व त्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे कुठलेही नियोजन स्थानिक पाटबंधारे कार्यालयाने केले नसून दरवर्षी स्थानिक परिसरातील मजूर लावून महिन्याभरापूर्वीच सर्व कालवे साफ करण्यात येत होते, परंतू यावर्षी शेतकऱ्यांच्या पेरण्या सुरु झाल्या असतांनाच घाईघाईने कालवे सफाई केली जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे असलदे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथे सिमेंट नाला बंधाऱ्यांचे निकृष्ट बांधकाम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(६७) * ३५९४ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे असलदे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथे सुमारे ६५ लाख रुपये खर्च करुन ६ सिमेंट नाला बंधारे बांधण्यात आले तथापि निकृष्ट बांधकामामुळे बंधाऱ्यात पाणी साचत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिमेंट नाला बंधाऱ्यांची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार निकृष्ट प्रतीचे बांधकाम होण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जलसंधारण विभागाच्या माध्यमातून लोककल्याणार्थ करण्यात आलेल्या कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत**

**(६८) * २९६५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंधारण विभागाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या १ हजार ३५१ कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १ हजार ३५१ कोटी रुपयांच्या या कामांमध्ये मुख्यत्वे सिमेंट नाला बंधारे, कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे, साठवण बंधारे, पाझर तलाव बांधणे आदी लोककल्याणार्थ कामे मुख्यत्वे विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोककल्याणार्थ कामांची स्थगिती उठवून सदर कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याच्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, प्रश्न भाग-३ बाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

यामध्ये मुख्यत्वे उर्वरित महाराष्ट्र (ठाणे/पुणे/नाशिक प्रदेश) व मराठवाडा प्रदेशातील जलसंधारणाची कामे असून, त्यात विदर्भातील योजनांचा समावेश नाही.

(३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या बैठकीतील विषय क्रमांक ५ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार उर्वरित महाराष्ट्र व औरंगाबाद प्रदेशातील स्थगिती देण्यात आलेल्या सर्व योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासून, योजना तांत्रिकदृष्टया योग्य / अयोग्य असल्याबाबत, महामंडळांतर्गत पुणे व नागपूर येथे कार्यरत दोन मुख्य अभियंते तसेच जलसंपदा विभागाचा एक मुख्य अभियंता यांची समिती गठित करुन अहवाल सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात नवरगांव रत्नापूर मार्गावर गोसीखुर्द उजव्या कालव्याचे अंतर्गत उपकालव्याचे निकृष्ट काम

**(६९) * २९३९ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात नवरगांव रत्नापूर मार्गावर गोसीखुर्द उजव्या कालव्याचे अंतर्गत उपकालव्याचे काम हे मातीकामावरच सिमेंटीकरण सुरू असल्याने सदर काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील लघुसिंचनाची कामे करण्याबाबत

**(७०) * ४०३३ श्री.रामराव वडकुते, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील लघुसिंचन जलसंधारण विभागाची कामे कार्यकारी अभियंता लघुसिंचन जलसंधारण, नांदेड यांनी दिनांक २० मे, २०१४ रोजी मे.एम.एस.कन्स्ट्रक्शन प्रा.लि.जळगांव यांच्या नावे वर्क ऑर्डस काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे आदेश निर्गमित करण्यात येऊनही ९ महिन्याचा कालावधी उलटूनही कामाला सुरुवात केली नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास जलसंधारण विभाग, प्रधान सचिव यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मे.एम.एस.कन्स्ट्रक्शन प्रा.लि.जळगांव कंपनी सदर काम करण्यास विलंब करीत असल्यास, सदर कंपनीची वर्क ऑर्डर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर कामांचे कार्यारंभ आदेश दिनांक २१ मे, २०१४ रोजी देण्यात आलेले आहेत. काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महीने आहे. सन २०१४ मध्ये पावसाळ्यामुळे कामाची सुरुवात झाली नाही. काम सुरु करण्याबाबत कंत्राटदारास सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच निविदेतील विहित कालावधीमध्ये कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार, विक्रमगड, मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुपोषण दूर करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(७१) * ४४९५ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात समावेश झालेल्या विक्रमगड, जव्हार आणि मोखाडा हे तीन तालुके तीव्र कुपोषित म्हणून ओळखले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुके कुपोषण मुक्त करण्यासाठी तत्कालीन मा.राज्यपालांच्या सूचनेनुसार जिल्हा परिषद, आदिवासी विकास विभाग आणि आरोग्य यंत्रणा यांच्या माध्यमातून पथदर्शी प्रकल्प हाती घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कुपोषण निर्मूलनासाठी उर्वरित वैधानिक महामंडळाकडून ४२ लाख रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच पालघर जिल्ह्यातील जव्हार, विक्रमगड, मोखाडा या ग्रामीण तालुक्यात निधी अभावी ग्राम बालविकास केंद्रे बंद असल्याने तालुक्यात कुपोषणाचा प्रश्न भेडसावत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त तालुक्यातील बालविकास केंद्रे सुरु करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशंत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील विक्रमगड, जव्हार व मोखाडा या तीन तालुक्यातील तीव्र कमी वजनाच्या बालकांच्या खालील आकडेवारीवरुन तीव्र कमी वजनाच्या बालकांच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | महिना | विक्रमगड | जव्हार | मोखाडा |
|---|---|---|---|---|
| १ | ऑगस्ट-१४ | १७३८ | २६७७ | ७९० |
| २ | सप्टेंबर-१४ | १६८४ | २४५३ | ७६० |
| ३ | ऑक्टोबर -१४ | १५८८ | २२५३ | ७१८ |
| ४ | नोव्हेंबर- १४ | १५४४ | २१५० | ७०५ |
| ५ | डिसेंबर-१४ | १४०१ | २००१ | ६४८ |
| ६ | जानेवारी-१५ | १२४८ | १८४१ | ६२८ |

(२) व (३) हे खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील महिला आणि ६ वर्षाखालील बालकांच्या पोषणाच्या दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी उर्वरीत वैधानिक विकास महामंडळाने **जव्हार-१** प्रकल्पात पथदर्शी प्रकल्प राबविण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यास आदिवासी विकास विभागाने शासन निर्णय क्र.राज्यपा-२०१३/प्र.क्र.१०३/का.१६, दि.२१/११/२०१३ अन्वये रु.४२,६०,०००/- इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानुसार जानेवारी २०१४ पासून पथदर्शी प्रकल्प सुरु आहे.

(४) व (५) माहे जून **२०१४** ते ऑक्टोबर **२०१४** या कालावधीत जव्हार मध्ये १२७, विक्रमगड मध्ये ८९, मोखाडा मध्ये १५६ **ग्राम बाल विकास केंद्र** घेण्यात आले आहेत. तसेच जव्हार मध्ये ८ बाल उपचार केंद्र घेण्यात आलेले आहेत.

सद्यस्थितीत पुनर्विनियोजनाने निधी प्रस्तावित केलेला आहे. निधी प्राप्त होताच ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्याच्या आरोग्य विभागाच्या अहवालानुसार मानसिक आरोग्यासाठी मंजूर केलेली पदे भरण्याबाबत**

**(७२) * ३८९८ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आरोग्य विभागाच्या अहवालानुसार महाराष्ट्रात सुमारे ८ ते १० लाख लोकांना मानसिक आजार असल्याचे शासनाने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून मानसिक आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या डॉक्टर, मानसोपचार तज्ञ, परिचारिका आदि अत्यावश्यक कर्मचारी वर्ग भरण्यास टाळाटाळ केली जात आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, मानसिक आरोग्यासाठी मंजूर केलेली पदे केव्हा भरण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येचा विचार करता राज्यात ८ ते १० लाख मानसिक रुग्ण असावेत असा अंदाज आहे.
(२) व (३) अत्यावश्यक कर्मचारी भरण्यास टाळाटाळ केली जाते हे खरे नाही. मनोविकृती चिकीत्सकांची ७९ पदे मंजूर असून २१ पदे भरलेली आहेत. उर्वरित ५८ पदांपैकी नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणी पत्र पाठविण्यात येत आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी संवर्गातील मानसोपचारतज्ञांच्या १४ पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती. त्यानुषंगाने १२ मानसोपचार तज्ञ उपलब्ध झाले असून ५ वैद्यकीय अधिकारी हजर झाले आहेत. वर्ग ३ ची तांत्रिक पदे सहसंचालक, आरोग्य सेवा, (हि.ह.व ज.रो) पुणे यांचे कार्यालयामार्फत व वर्ग ३ व वर्ग ४ ही पदे उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्या कार्यालयामधून भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निभोरा ग्रामपंचायत (ता.कळंब,जि.यवतमाळ) अंतर्गत विविध कामांच्या निधीत गैरप्रकार झाल्याबाबत

**(७३) * ३३०९ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निभोरा ग्रामपंचायत (ता.कळंब,जि.यवतमाळ) अंतर्गत विविध कामाच्या निधीत गैरप्रकार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत सचिव व अधिकाऱ्यांवर शासनाने काय कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामपंचायत निंभोरा, ता.कळंब, जिल्हा यवतमाळ अंतर्गत विविध कामाच्या निधीत गैरप्रकार झाल्याची तक्रार निंभोरा या गावातील नागरिकांनी दि.५/१/२०१५ रोजी केली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्याकरिता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राळेगाव, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती राळेगाव व शाखा अभियंता, पंचायत समिती राळेगाव यांची चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. चौकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार तत्कालीन ग्रामसेवक श्री.अग्रहारी, यांनी

स्वतःचे नांवे चेक लिहून स्वतः संपूर्ण (रु.२ लाख) रक्कमेची उचल केलेली आहे. तसेच श्री.प्रभाकर डगवार यांचे घरापासून ते उत्तम मांढरे यांच्या घरापर्यंत व नदीपर्यंत नालीचे बांधकाम न करता ६ महीने सदर बांधकामाच्या पैशाची अफरातफर केली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर दिनांक ६/१/२०१५ रोजी सदर २ लाख रुपये ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा करण्यात आले. चौकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार संबंधित दोषी तत्कालीन ग्रामसेवक श्री.आर.आर.अग्रहारी, ग्रामपंचायत निंभोरा यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कुष्ठरुग्णांना पुरेशा प्रमाणात औषध आणि ग्वाज बॅंडेजचा पुरवठा करणेबाबत**

**(७४) * ५४३३ श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कुष्ठरुग्णांच्या वस्त्यांमध्ये कुष्ठरुग्णांच्या जखमावर औषधोपचार करण्यासाठी औषधे आणि ग्वाज बॅंडेजचा पुरवठा माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राज्यातील कुष्ठरुग्णांना पुरेशा प्रमाणात औषध आणि ग्वाज बॅंडेजचा पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
माहे, जुलै २०१४ वा त्यादरम्यान सर्व कुष्ठवसाहतींना जखमांवर औषधोपचार करण्यासाठी औषधे व ग्वाज बॅंडेजचा पुरवठा करण्यात आलेला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोरेगांव बुद्रुक (ता.खेड जि.पुणे) येथील आरोग्य उपकेंद्रावर आरोग्य कर्मचारी वर्गाच्या तक्रारीबाबत**

**(७५) * ३१५४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव बुद्रुक (ता.खेड जि.पुणे) येथील आरोग्य उपकेंद्रावर आरोग्य कर्मचारी वेळेवर हजर राहत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आरोग्य उपकेंद्रांवर नियुक्ती झाली असूनदेखील येथील कर्मचारी अन्य ठिकाणी राहत असल्याने आरोग्य कर्मचारी वर्गाच्या कामचुकारपणामुळे सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे,

आरोग्य उपकेंद्र कोरेगांव बुद्रुक येथील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका (महिला) यांची पदे अनुक्रमे बदली व नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे रिक्त आहेत. तथापि, आरोग्य उपकेंद्रातील नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र, कुडे बु.ता.खेड अंतर्गत उपकेंद्रसाकुर्डी येथील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातर्गत आरोग्य सेवक (महिला) यांना तात्पुरत्या स्वरुपात काम पाहण्याचे आदेश दिले आहेत. तसेच आरोग्य सेवक पदांचा अतिरिक्त कार्यभार उपकेंद्र किवळे येथील आरोग्य सेवक यांचेकडे सोपविण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## जिंतुर (जि.परभणी) तालुक्यातील कर्परा मध्यम प्रकल्प सांडव्याच्या कामाबाबत

**(७६) * २७८५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतुर (जि.परभणी) तालुक्यातील कर्परा मध्यम प्रकल्पाच्या सांडव्याचे काम विहित मुदतीत न केल्यामुळे तसेच इतर कारणावरुन येथील प्राध्यापक डॉ.ठोंबरे यांनी वेळोवेळी लढा दिल्याने शासनाने संबंधित कंत्राटदारास सन २०१४-१५ दरम्यान नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहित मुदतीत काम न करता विकास कामात दिरंगाई करणाऱ्या व शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित ठेवणाऱ्या दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) कामाची प्रगती नसल्याने संबंधीत कंत्राटदारास क्षेत्रिय कार्यालया मार्फत सात नोटीस देण्यात आल्या आहेत.
(२) व (३) सांडव्याच्या दुरुस्ती कामामुळे प्रकल्पातील सिंचनावर परिणाम झालेला नाही. मागील पाच वर्षाचे वर्षभर सिंचन (१) २००९-१०-१८२४ हेक्टर, (२) २०१०-११-१५४१ हेक्टर, (३) २०११-१२-२६२६ हेक्टर, (४) २०१२-१३-१६१० हेक्टर, (५) २०१३-१४-१६०७ हेक्टर झालेले आहे. सांडवा व कालवा दुरुस्ती कामे हि निविदा शर्ती प्रमाणे सुरु आहेत.

-----------------

**माळशिरस (जि.सोलापूर) या तालुक्याच्या पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(७७) * ४२८१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळशिरस (जि.सोलापूर) या तालुक्याच्या पंचायत समितीसाठी प्रशासकीय इमारतीचे बांधकाम चार वर्षे होवूनही पूर्ण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः होय.
(२) व (३) सदरहू इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून ते माहे मार्च, २०१५ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**लोहा शहरातील (ता.लोहा,जि.नांदेड) जायकवाडी वसाहतीच्या जागेची झालेली परस्पर नोंदणी**

**(७८) * ४३७६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहा शहरातील (ता.लोहा, जि.नांदेड) जायकवाडी वसाहतीच्या जागेची परस्पर नोंदणी करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बाब निदर्शनास आल्यानंतर माजलगांव कालवा ७ गंगाखेड येथील कार्यकारी अभियंता व कार्यालयाने जायकवाडी वसाहत आमच्या ताब्यात असून कोणत्याही नोंदणी संदर्भात कारवाई करतांना आमचे म्हणणे ऐकूण घ्यावे असे पत्र संबंधित जिल्हाधिकारी व लोहा तहसिलदारांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.
(३) प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कायदा सल्लागार, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या कडून कायदेशीर सल्ल्यानुसार शासनाच्या वतीने कायदेशीर सल्यानुसार शासनाच्या वतीने कार्यकारी अभियंता यांनी खरेदी विक्री करणा-या विरुध्द दिवाणी न्यायधीश वरिष्ठस्तर कंधार, जिल्हा नांदेड येथे दिनांक ०७/०२/२०१५ रोजी शपथ पत्र दाखल केले असता दिवाणी न्यायाधीश, कंधार यांनी प्रकरणाचे कार्यक्षेत्र लोहा येत असल्यामुळे प्रकरण दिवानी न्यायालय, कनिष्ठस्तर लोहा येथे दाखल करावे असे आदेशीत केल्यामुळे प्रकरण लोहा दिवानी न्यायालय येथे क्रमांक आरसीएस क्रमांक ३२/२०१५ अन्वये दाखल करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुण्यातील ४१ रुग्णालयात कॅशलेस सेवा सुरु करण्याबाबत

**(७९)** * **५६५२ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील ४१ रुग्णालये कॅशलेस सेवेच्या यादीत समाविष्ट असल्याचे इन्शुरन्स रेग्युलेटरी डेव्हलपमेंट अॅथॉरिटीला सांगण्यात आले असले तरी प्रत्यक्षात या यादीतील सर्व रुग्णालये कॅशलेस सेवा पुरवत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची कॅशलेस सेवा बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, ही सेवा पूर्ववत सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही. इन्शुरन्स रेग्युलेटरी डेव्हलपमेंट अॅथारिटी ही राज्य शासनाच्या अधिपत्याखालील नसून केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील आहे.

तथापि, या विभागामार्फत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत पिवळी, अंत्योदय, अन्नपूर्णा व केशरी शिधापत्रिकाधारक (रु.एक लक्ष पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या) कुटुंबांना योजनेमध्ये समिावष्ट ९७१ प्रोसिजर्सवरील प्रतीवर्ष / प्रतीकुटुंब रु. १.५० लक्ष एवढ्या मर्यादेपर्यंत कॅशलेस उपचार घेता येतात. सदर योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातील ३३ रुग्णालयांचा समावेश आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत पुणे जिल्ह्यातील कोणत्याही रुग्णालयाने योजनेंतर्गत उपचार देणे बंद केलेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयातील स्थानिक ग्रामपंचायतींना आईएसओ दर्जा मिळण्याबाबत**

**(८०) * ५४५५ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील स्थानिक ग्रामपंचायतीना आईएसओ दर्जा मिळण्याकरिता अनेक प्रयत्न करुन सुशोभिकरण, सोयी सुविधा सदरहू ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध करुन दिली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयात २५० गावे असुन आईएसओ दर्जा मिळावा हे उद्दीष्ट संबंधित जिल्हा परिषदेने ठेवले असुन त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु असुन सदरहू प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) औरंगाबाद जिल्हयातील २५० ग्रामपंचायतींना आय.एस.ओ. दर्जा मिळण्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील परळ येथील महात्मा गांधी रुग्णालयात कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(८१) * ५५३२ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळ (मुंबई) येथील महात्मा गांधी रुग्णालयात १७० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सदर पदे किती कालावधीत भरण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, परेल, मुंबई या रुग्णालयातील एकूण ५८८ पदे मंजूर असून त्यापैकी ३८१ पदे भरलेली आहेत व २०७ पदे रिक्त आहेत.

(२) होय.
(३) महात्मा गांधी स्मारक रुग्णालय ह त्रिसदस्य न्यासाचे रुग्णालय असून त्यामध्ये राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली, राज्य शासनाचे प्रतिनिधी व मिल ओनर्स असोशिएशन यांचा समावेश आहे. सदर न्यासाच्या व्यवस्थापकीय मंडळाचे अध्यक्ष महासंचालक, राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली, श्रम मंत्रालय, भारत सरकार हे असून मागील ४ वर्षात व्यवस्थापकीय मंडळाची बैठक झालेली नाही. त्यामुळे सदर रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत निर्णय होऊ शकला नाही.

राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. तसेच व्यवस्थापकीय मंडळाच्या बैठक घेण्याकरिता राज्य कामगार विमा महामंडळाकडे पाठपुरावा सुरु आहे. व्यवस्थापकीय मंडळाच्या आगामी बैठकीत रिक्त पदांचा विषय मांडण्यात येईल.
(४) व्यवस्थापकीय मंडळाची बैठक न झाल्याने रिक्त पदे भरण्याबाबत विलंब झालेला आहे.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयातील लघू पाटबंधारे प्रकल्पांतर्गत धरणे व कालव्यांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(८२) * ५७८७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ८८२ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील लघू पाटबंधारे प्रकल्प देंदोनवाडी, ओडव, शिवडाव, माधवडे, तळैरे, निरुखे या प्रकल्पापैकी निरुखे,देंदोनवाडी लघु पाटबंधारे वनजमिन प्रस्ताव मंजूरी अभावी व उर्वरीत प्रकल्पांची कामे प्रामुख्याने भुसंपादनाअभावी अपूर्ण होती ती कामे पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्याप अपूर्ण असलेली धरणे व कालव्यांची कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अशंत: खरे आहे.
(२) व (३) शिवडाव ल.पा.योजना पुर्ण झाली आहे. निरुखे व देंदोनवाडी लपा प्रकल्प वनजमिन प्रस्ताव मंजूरी अभावी व उर्वरित प्रकल्पांची कामे प्रामुख्याने भूसंपादनाअभावी अपुर्ण स्थितीत आहेत. भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर वित्तीय तरतुदीनुसार प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील कुमारी मातांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(८३) * ३०२७ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ४९८१० ला दिनांक १४ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी बहुल झरी जामणी तालुक्यात सन २०१३-२०१४ मध्ये ५२ कुमारी माता होत्या तर २०१४-२०१५ या वर्षात ही संख्या वाढून १९९ झाली, हे खरे आहे काय,

(२) आदिवासी व दलित महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठीचे कठोर कायदे, विविध सरकारी योजना कुचकामी ठरण्याचे दिसून येते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील तेलंगण सीमेलगतच्या झरी जामणी तालुक्यात कुमारी मातांची समस्या सोडविण्याबाबत मागील वर्षात राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्यांनी भेट देऊन या मातांच्या पुनर्वसनाला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले होते परंतू याबाबत अद्यापही उचित कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) जून, २०१४ मध्ये दिलेल्या माहितीप्रमाणे यवतमाळ जिल्ह्यातील कुमारी मातांची संख्या ११७ इतकी होती व सद्यस्थितीत म्हणजेच फेब्रुवारी, २०१५ मध्ये कुमारी मातांची संख्या १३५ इतकी आहे.

(२) आदिवासी विकास विभागामार्फत वैयक्तिक तसेच शैक्षणिक लाभांच्या योजनांतर्गत कुमारी माता तसेच त्यांच्या अपत्यांना प्राधान्याने लाभ देण्याबाबत उचित कार्यवाही करण्याचे निर्देश आदिवासी विभागाच्या दिनांक ७ ऑगस्ट, २०१४ च्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना देण्यात आले आहेत.

आदिवासी कुमारी मातांसाठी वेगळी पुनर्वसन योजना तयार करण्याच्या हेतूने विदर्भातील कुमारी मातांच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून चालू आर्थिक वर्षात अभ्यास प्रकल्प प्रस्तावित असून, त्याअंतर्गत कुमारी मातांच्या प्रश्नांचे गांभीर्य, आवश्यक उपाययोजना व पुनर्वसनाबाबत अभ्यास करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाकरीता एकूण रु. २३,०३,८८६/- इतकी तरतूद आवश्यक असून ती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही आदिवासी विभागामार्फत सुरु आहे.

(३) व (४) कुमारी मातांच्या प्रश्नासंदर्भात मा.श्रीमती निर्मलाताई सावंत (प्रभावळकर) सदस्या, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांनी केलेल्या दौऱ्यात कुमारी मातांची समस्या लक्षात घेता, त्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांना त्यांच्या क्षमतेनुसार प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये एक विश्वास निर्माण करुन त्यांना भविष्यात उभे करता यावे याकरीता मारेगाव तालुक्यातील मौजे टाकरखेडा गट क्र. ३४ व ३५ येथील ५ एकर ई-क्लास जमिनीवर स्वाधार केंद्र

उभारण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे. करीता कुमारी मातासाठी पुरस्कृत स्वाधार केंद्राचे बांधकामाचे अंदाजपत्रक मिळणेकरीता मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा यांना प्रस्ताव सादर केलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गरिबांसाठी आखलेल्या मनरेगा योजनेवरील खर्चात २० टक्के कपात केल्याबाबत**

**(८४) * ३५७५ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरगरीबांसाठी आखलेल्या मनरेगा योजनेवरील खर्चात २० टक्के कपात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खर्चातील कपातीमुळे कोट्यवधी गरीब कुटुंबियांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग-१ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार केंद्र शासनाने मनरेगा निधीत कपात करु नये पाठपुराव्यादाखल म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी केंद्र शासन प्रत्येक वर्षी लेबर बजेट मंजूर करते. त्यानुसार केंद्र शासनाकडून राज्य शासनास निधी प्राप्त होतो. केंद्र शासनाने १०० दिवस प्रती कुटुंब मजूरीची हमी घेतली असल्याने १०० दिवस प्रती कुटुंब मर्यादेत खर्चाचा भार उचलते. सन २०१४-१५ करिता केंद्र शासनाने मंजूर केलेल्या लेबर बजेट एवढे मनुष्यदिन निर्मिती होण्याची शक्यता असल्याने केंद्र शासनाकडे मंजूर लेबर बजेटच्या मर्यादेत निधीची मागणी तसेच विदर्भ व मराठवाडा या विभागातील दुष्काळ विचारात घेता केंद्र शासनाने १०० दिवस प्रती कुटुंब ऐवजी १५० दिवस प्रती कुटुंब मजूरीचा खर्च त्या विभागासाठी राज्य शासनास द्यावा अशी मागणी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय रुग्णालयामध्ये कर्मचारी, डॉक्टर यांच्या बदलीकरिता योजना आखण्याबाबत**

**(८५) * ५१०८ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकिय रुग्णालयामध्ये कर्मचारी, डॉक्टर यांची बदली होण्याकरिता निकष आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलीचे निकष कोणते आहेत,

(३) असल्यास, शासकीय रुग्णालयमधील बरेच कर्मचारी व डॉक्टर अनेक वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत आहेत त्यांच्याकरिता शासनाने काही योजना प्रस्तावित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ अन्वये बदलीचे निकष ठरविण्यात आलेले आहेत.

(३) आरोग्य सेवेतील क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांना सर्वसाधारण बदलीचा अधिनियम लागू केल्याने अनेक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले असून या सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचे बदल्यांचे विनियमनासाठी स्वतंत्र अधिनियम प्रस्तावित करण्याची बाब विचाराधीन आहे. सदर प्रस्ताव प्राथमिक टप्प्यावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंचायत समिती खामगांव (जि.बुलढाणा) अंतर्गत असलेल्या ग्रामसेवकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत**

**(८६) * ४०३७ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ९२५ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती खामगांव (जि.बुलढाणा) अंतर्गत मोठ्या प्रमाणावर ग्रामसेवकांच्या जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका ग्रामसेवकाला ३-३ गावांचा अतिरिक्त प्रभार देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एका ग्रामसेवकाला अतिरिक्त प्रभार दिल्यामुळे त्यांच्या मुळ गावातील विकास कामे रेंगाळत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना बँकांचे कर्ज काढण्याकरीता शासनाने इतर दाखले मिळण्यासाठी त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ग्रामसेवकांच्या परिक्षापूर्ण होऊनसुध्दा त्यांना नियुक्त्या दिल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) खामगांव पंचायत समिती अंतर्गत ग्रामसेवक संवर्गाची एकूण ६८ मंजूर पदे असून रिक्त ९ पदे आहेत.
(२), (३) व (४) गावातील विकासकामे तसेच ग्रामपंचायतीचा कार्यभार सुरळीत चालण्याच्यादृष्टीने तुलनात्मकदृष्ट्या हलका कार्यभार असलेल्या ग्रामसेवकांकडे रिक्त पदांचा कार्यभार सोपविला असल्याने विकासाची कामे रेंगाळली नाहीत.
(५) व (६) नोव्हेंबर, २०१४ मध्ये कंत्राटी ग्रामसेवकांच्या पदासाठी घेण्यात आलेल्या परिक्षांमधून नियुक्ती झालेल्या उमेदवारांपैकी रुजू झालेल्या उमेदवारांना पायाभूत प्रशिक्षण देणे आवश्यक असून अशा प्रशिक्षणाअंती पंचायत समिती खामगांव येथील रिक्त पदे उपलब्धतेनुसार प्राथम्याने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## वाशिम व अमरावती जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत अपूर्ण राहिलेल्या धडक सिंचन विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत

**(८७) * ३८६७ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६२७ ला दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागातील व वर्धा जिल्ह्यातील धडक सिंचन विहिर योजने अंतर्गत ३४३४ व महाराष्ट्रातील ग्रामीण रोजगार अंतर्गत १२२४१ विहिरींची कामे ज्या कारणांमुळे अपूर्ण राहिली त्याबाबत संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(२) असल्यास, अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याच्या सूचना क्षेत्रिय यंत्रणेस केव्हा देण्यात आल्या,
(३) असल्यास, सदर सूचनेनुसार अपूर्ण कामे करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्यानुसार कामकाजास सुरूवात करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील विहीरींची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनस्तरावरुन विभाग / जिल्हानिहाय बैठका घेण्यात आल्या आहेत. सदर बैठकांमध्ये विहीरी पूर्ण करण्यास क्षेत्रिय स्तरावर येणा-या विविध अडचणी विचारात घेवून शासनस्तरावरुन वेळोवेळी सुधारीत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने विहीरीची कामे पूर्ण करण्यास दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतीत विहीरी पूर्ण करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोयना अभयारण्य क्षेत्रातील २१५ बेकायदेशिर पवनचक्यांना**
**सुमारे ३५ कोटींचा दंड आकारण्याबाबत**

**(८८) * ३२५२ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना अभयारण्याच्या क्षेत्रात उभारण्यात आलेल्या सुमारे २१५ पवनचक्या व १० रिसॉर्ट बेकायदेशिर ठरवून त्यांना ३५ कोटी रूपयांचा दंड आकारण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार सदर पवनचक्क्या व रिसॉटच्या मालकांकडून शासनाने दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, केव्हा व किती रक्कम वसूल करण्यात आली आहे,

(४) अद्याप दंडाची रक्कम वसूल केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक १६.०१.२०१५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने कोयना अभयारण्यातील २०६ पवनचक्क्यांच्या अवैध कामांबाबत मा.केंद्रीय सशक्तता समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार नक्त वर्तमान मूल्य जमा करणेचे निर्देश दिलेले आहेत.

(२) व (३) सदर रक्कम जमा करण्यास संबंधितास मा.सर्वोच्च न्यायालयाने तीन महिन्याची मुदत दिलेली आहे. अद्याप रक्कम जमा करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) येथील सामान्य रुग्णालयास अतिरिक्त**
**जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देणेबाबत**

**(८९) * ५२४४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहर व तालुका परिसराची वाढती व्याप्ती, लोकसंख्येतील प्रचंड वाढ व त्यातुलनेत आरोग्य सुविधेची कमतरता याबाबी विचारात घेवून मालेगांव येथे ३५ कोटी रुपये खर्चून स्थापित २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयात अद्यापही मुलभूत सोयीसुविधांचा बऱ्याच प्रमाणात अभाव असल्याचे पार्श्वभुमीवर या रुग्णालयास अतिरिक्त जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची मागणी स्थानिक पातळीवर करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे रुग्णालय सुरू होऊन सहा वर्षाचा कालावधी होऊनही तेथील अनेक पदे रिक्त असल्याने कर्मचाऱ्यांची असलेली कमतरता, बंद अवस्थेतील असलेली उपकरणे, अस्वच्छता यामुळे रुग्ण सेवेवर प्रतिकुल परिणाम होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालेगांव तालुका परिसरातील रुग्णांना अपेक्षित आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन देऊन सामान्य रुग्णालयास अतिरिक्त जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच मालेगांव येथे अतिरिक्त जिल्हा दर्जाचे रुग्णालय सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळुन येत नाही. तथापि, राज्यात जिल्हा रुग्णालय किमान २०० खाटांचे असावे असा निकष आहे.
(२), (३), (४) व (५) मालेगांव शहराची लोकसंख्या व तालुका परिसराची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन सन २००९ मध्ये मालेगांव येथे २०० खाटांचे सामान्य रुग्णालय सुरु करण्यात आले आहे.

या रुग्णालयातील रिक्त पदांचा वर्गनिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहेः-

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वर्ग-१ | १७ | ३ | १४ |
| वर्ग-२ | २८ | २७ | १ |
| वर्ग-३ | १५५ | ११८ | ३७ |
| वर्ग-४ | १०५ | ९ | ९६ |
| एकूण | ३०५ | १५७ | १४८ |

सामान्य रुग्णालय, मालेगांव येथील रुग्णसुविधेबाबतची सर्व उपकरणे चालू स्थितीत असून, सर्व तज्ञांमार्फत व उपलब्ध अधिकारी / कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णांना रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यामुळे रुग्णसेवेवर कोणताही प्रतिकुल परिणाम होत नाही.

त्यामुळे सद्यस्थितीत मालेगांव येथे आणखी जिल्हा रुग्णालय देण्याची कोणतीही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील जंगल विभागातील रस्ते बनवून देण्याबाबत**

**(९०) * ३४२७ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील जंगल विभागातील रस्ते बनवून देण्याची मागणी माहे जानेवारी, २००९ पासून करुन माहे डिसेंबर, २०१४ अखेर जंगल विभागातील रस्ते दुरुस्त करण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्ते दुरुस्त न करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) तालुक्यात कोकण टाईप बंधाऱ्यांची पाणीगळती थांबविण्याबाबत**

**(९१) * ४०६६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात विविध कोकण टाईप बंधाऱ्यांचे पाणी अडविण्यासाठी टाकलेल्या गेटच्या कामांमध्ये गैरकारभार केल्याची बाब माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्याच आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यातील पाणी गळतीमुळे बंधाऱ्यावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर भाजीपाला, शेतीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व सदर बंधाऱ्याची गळती थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्यापी, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

पालघर जिल्हा परिषदेच्या लघू पाटबंधारे विभागामार्फत वाडा तालुक्यात १७ कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधण्यात आलेले आहेत. दरवर्षी प्रमाणे जिल्हा परिषद निधीतून सन २०१४ च्या पावसाळयानंतर या बंधा-याच्या गेट/फळया बसवून पाणीसाठा करण्यात आलेला आहे.

बंधा-याच्या सिंचन क्षेत्रात ब-याच शेतक-यांनी भाजीपाला लागवड केलेली आहे. पाणी गळती मुळे भाजीपाला नुकसानीबाबत कोणतीही तक्रार आढळून आलेली नाही. गेट बसविण्याचे कामामध्ये गैरकारभार झालेला नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात स्वाईन फ्ल्यूवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत**

**(९२) * ५५०७ ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नागपूर, औरंगाबाद, पुणे तसेच मुंबईसह इतरत्र स्वाईन फ्ल्यूचे ११३-२५० रुग्ण आढळून आले असून त्यापैकी २७ जणांचा या रोगाने मृत्यू झाल्याचे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वाईन फ्ल्यू रोगाचा राज्यात वाढणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणकोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, शासनाने स्वाईन प्ल्यू आटोक्यात आणण्यासाठी व स्वाईन फ्ल्युच्या रुग्णांसाठी महापालिका व सरकारी रुग्णालयात राखीव खाटा ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच तातडीच्या औषधोपचाराअभावी स्वाईन फ्ल्यू रोगाने मृत्यू पावलेल्यांच्या कुटूंबियांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ६ फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत राज्यात स्वाईन फ्ल्युचे १६८ रुग्ण आढळले असून त्यापैकी ३४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे आणि ७० रुग्णांना ते बरे झाल्यानंतर रुग्णालयातून सोडण्यात आले आहे.
(२) स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध व नियंत्रणासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना :-

१. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात व शहरी भागात पुरेशी स्क्रिनिंग सेंटर्स व विलगीकरण कक्ष कार्यरत.
२. खाजगी रुग्णालयांनाही एन्फलयुएन्झा वरील उपचाराची परवानगी.
३. सर्व आरोग्य संस्थांना पुरेसा औषध पुरवठा.
४. खाजगी औषध दुकानातील औषध उपलब्धतेबाबत अन्न व औषध प्रशासनाशी नियमित समन्वय.

५. बाधित रुग्णांच्या सर्व निकट सहवासितांचा शोध व उपचार.

६. खाजगी प्रयोगशाळा व रुग्णालयांच्या प्रतिनिधींशी नियमित समन्वय.

७. आरोग्य शिक्षण.

(३) राज्यातील सर्व उप जिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, संसर्गजन्य आजार नियंत्रण रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न रुग्णालये आणि म.न.पा. रुग्णालये या सर्व ठिकाणी स्वाईन फ्ल्यु रुग्णांसाठी किमान ४ खाटांचे विलगीकरण कक्ष स्थापन करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) साथरोग उद्रेकात मृत्यू पावलेल्यांसाठी सध्या अर्थसहाय्याची कोणतीही योजना नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तेल्हारा पंचायत समिती अंतर्गत आडसूळ (जि.अकोला) येथे मजुरांना रोजगार मिळण्याबाबत

**(९३) * २९२३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेल्हार पंचायत समिती अंतर्गत आडसूळ (जि.अकोला) येथे मजुरांना काम नाही, ग्रामपंचायतीकडे रोजगार मिळण्याबाबतचे मागणीचे निवेदन देऊनही रोजगार मिळत नसल्याने मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १० डिसेंबर रोजी रोजगार सेवकांकडे १५० मजुरांच्या सहीचा अर्ज देऊनही अद्यापी कुठलेच काम देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली असल्यास त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, याप्रकरणी विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी पंचायत समिती तेल्हारा अंतर्गत रोहयोची कामे सुरु करणेबाबत ५० गावक-यांनी ग्रामपंचायती आडसूळ यांचेकडे विनंती अर्ज केला आहे. सदर अर्जाबाबत ग्रामपंचायत सचिव यांनी वेळेत कार्यवाही न केल्याचे प्राथमिक चौकशी अंती दिसून आले आहे. सद्य:स्थितीत कामाची मागणी केलेल्या मजूरांना काम उपलब्ध करुन दिले आहे.

या प्रकरणी ग्रामसेवक व ग्राम रोजगार सेवक दोषी असल्याचे आढळून आल्याने तत्कालीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तर ग्राम रोजगार सेवक यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अंजनवेल नं.१ या शाळेत शिक्षकांची नियुक्ती करणेबाबत**

**(९४) * ४४५२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अंजनवेल नं.१ या शाळेत शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असल्याने शाळेत पर्यायी शिक्षक न दिल्यास आंदोलन करण्याचा इशारा सरपंचांनी पंचायत समितीकडे केला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शाळेत पर्यायी शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर शाळेत ५ शिक्षक पदे मंजूर असून कार्यरत शिक्षक संख्या ५ आहे. यापैकी एक शिक्षिका या प्रसुती रजेवर गेल्या असून दुस-या शिक्षिका या बी.एड साठी दिर्घ मुदत रजेवर आहेत. शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून अन्य एका पदवीधर शिक्षकाच्या सेवा या शाळेसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**नागपूर जिल्ह्यात घरकुल उभारणीसाठी कार्यवाही करणेबाबत**

**(९५) * ३८५५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात घरकुल योजनेचे काम संथगतीने सुरू असून सदर योजनेतील घरकुलांसाठी १४ कोटी दिले असता केवळ घरकुल उभारणीसाठी ४ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच घरकुलाचे काम लवकरात लवकर करण्यात यावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळू धरणाला जमीन मिळण्यासाठी ग्रामस्थांचे बोगस ठराव सादर केल्याबाबत

**(९६) * २७१६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, पर्यावरण खात्याची मंजुरी यापैकी कोणत्याही बाबी मार्गी लागलेल्या नसताना सर्व परवानग्या मिळतील हे गृहीत धरून ठाणे जिल्ह्यातील काळू धरण प्रकल्पासाठी ११० कोटी रुपये खर्च करणाऱ्या जलसंपदा विभागाने या प्रकल्पासाठी आवश्यक वनजमिनीच्या हस्तांतरणासाठी परवानगी मिळवण्यासाठी या भागातील ग्रामस्थांचे बोगस ठराव सादर केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाने ज्या तारखांचे ग्रामसभा ठराव केंद्रीय वनविभागास सादर केले आहेत त्यादिवशी संबंधित गावाच्या ग्रामसभा झाल्याच नसल्याचे ग्रामसेवकांनी शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गैरकारभार करुन काळू धरणासाठी वनविभागाची तत्वत: मंजुरी मिळवल्याचे माहितीच्या अधिकारात मिळालेल्या कागदपत्राद्वारे निदर्शनास आले असतानाही या प्रकरणी चौकशी होऊन संबंधीत दोषींविरोधात कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर काळू धरण प्रकल्पासाठी एक हजार हेक्टर वनजमीन हस्तांतरित होणे आवश्यक असून, त्यासाठी या वनजमिनीवरील एक लाखाहून अधिक झाडे तोडावी लागणार असल्याने वनहक्क कायद्यानुसार वनजमीन हस्तांतरणासाठी बाधीत क्षेत्रातील ग्रामस्थांचे संमतीदर्शक ठराव बंधनकारक असून ते शक्य नसल्यामुळेच व या धरण प्रकल्पास स्थानिक ग्रामपंचायतीचा विरोध असल्याने व बेकायदेशीरपणे काम करणाऱ्याविरुध्द कारवाई करण्याचे ठराव सदर ग्रामपंचायतीनी केले असतानाही पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून केंद्रीय वन खात्याला ग्रामसभांचे बोगस ठराव सादर केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

तथापि, सदर ठराव बनावट आहेत किंवा कसे याविषयी पोलीस तपास सुरु आहे.

(२) आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सद्य:स्थितीत प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यातील रस्त्याचे अपूर्ण राहिलेले काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत**

**(९७) * ४४४७ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील सावनेर-खिरसाना-निरसानड या मंजूर रस्त्याचे अपूर्ण राहिलेले काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, अमरावती यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी सदर निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नांकीत रस्त्याचे नाव रस्ते विकास आराखडा सन २००१- २०२१ नुसार लोणी मोरगाव जनुना टिमटाळा सावनेर प्र.जि.मा.७८ असे असून सदर रस्त्यावरील कि.मी. १४/०० ते १६/०० मधील डांबरी सुधारणा काम जि.प.बांधकाम विभागामार्फत करारनामा तरतुदीनुसार डिसेंबर २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला असल्याने कि.मी. १६/०० ते १७/०० मधील रस्ता सुधारणेचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प योजनेत्तर कार्यक्रमांतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गृहागर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) तळवली शेवरी फाटा ते आगरवाडी या मार्गावरील डांबरीकरणाची कामे अर्धवट स्थितीत ठेवल्याबाबत**

**(९८) * ३५८५ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गृहागर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) तळवली शेवरी फाटा ते आगरवाडी या मार्गावरील डांबरीकरणाची कामे अर्धवट स्थितीत ठेवल्याने नागरीकांना सद्यःस्थितीत ये-जा करण्यात अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याचे अर्धवट स्थितीत असलेले डांबरीकरणाचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

सदर रस्त्याचे कि.मी.०/० ते १/१०० या भागामधील डांबरीकरणाचे काम दि. १५/०१/२०१५ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय अथवा निमशासकीय कर्मचाऱ्यांना सेवेत असताना मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबाबत**

**(९९) * २९६६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत असताना मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचे सुमारे १७२ प्रस्ताव सन २००८ पासून प्रलंबित असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास तसेच सन २००८ मध्ये मृत पावलेल्या बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके देखील गहाळ झाल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये मृत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांची सेवाज्येष्ठता यादी तयार करुन या वारसांकडून हरकती मागविण्यात येऊन अद्यापही जिल्हापरिषद प्रशासनाने सदर प्रलंबित अर्जावर कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपाचे प्रस्ताव रखडण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा तत्वावर वारसांना नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६) दिनांक २१.६.२०१४ रोजी प्रसिध्द केलेल्या अनुकंपा जेष्ठता प्रतिक्षायादीनुसार ठाणे जिल्ह्यात १७२ प्रस्तावापैकी सन २०१३ मध्ये १४ व सन २०१४ मध्ये ४६ अशा एकूण ६० उमेदवारांना नियमानुसार उपलब्ध जागांवर नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

या व्यतिरिक्त जून २०१४ नंतर आज अखेर अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी ७२ अपूर्ण स्वरुपातील प्रस्ताव प्राप्त झालेले असून याबाबतच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन हे प्रस्ताव नियमित सेवाजेष्ठता यादीत समाविष्ठ करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत बांधकाम विभागातील मयत कर्मचा-यांची सेवापुस्तके त्यांच्या कुटूंब निवृत्ती वेतन आदेशासहीत संबंधित उप विभागीय कार्यालयाच्या दप्तरी असून गहाळ झालेली नाहीत.

शासन नियमानुसार सरळसेवेच्या पदावर जेष्ठतासूचीतील क्रमवारीनुसार उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही पद उपलब्धतेनुसार करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गडचिरोली जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करुनही जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक खाली आल्याबाबत**

**(१००) * २९६२ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी दर वर्षी विविध विभागाच्या माध्यमातून निधी प्राप्त होवूनही गेल्या ५ वर्षात विकास योजनावर १२१७ कोटी ५० लाख ७० हजार रुपये खर्च झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजय केळकर समितीच्या अहवालानुसार जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक राज्यात सर्वात खाली असून या जिल्हयातील दरडोई उत्पन्नमध्ये भरीव वाढ झाली नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मानव विकास निर्देशांक सर्वात खाली येण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास उक्त निधीचा योग्य वापर होत आहे काय याची चौकशी शासनाने केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) गडचिरोली जिल्हयात मागील ५ वर्षात विविध विकास योजनासाठी १२३६ कोटी ५९ लक्ष निधी खर्च झाला आहे.

(२) होय, केळकर समितीच्या अहवालाप्रमाणे गडचिरोली जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक ०.६२ असून महाराष्ट्रात ३४ व्या क्रमांकावर आहे. तथापि, मागील दशकात त्यात सुधारणा झाली असून गडचिरोली जिल्हयाच्या दरडोई उत्पन्नातही वाढ झालेली आहे.

(३) मानव विकास निर्देशांक पुढील तीन निकषांवर आधारित आहे :-

१.शिक्षण

२.आरोग्य

३. आर्थिक स्थिती.

वरील तीन निकषांच्या आधारे गडचिरोली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी असल्याचे दिसून आले आहे.

(४) उक्त निधीचा योग्य वापर होत आहे त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बालगृहाचे थकीत अनुदानाबाबत**

**(१०१) * ४४९८ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात महिला व बाल कल्याण विभागासाठी ३३७८.३८९ कोटी इतक्या रकमेच्या केलेल्या आर्थिक तरतुदीपैकी, केवळ रक्कम रुपये १५६९.६१० कोटी इतकीच रक्कम माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान अखेरपर्यंत खर्च झाली असल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील ८० ते ९० हजार अनाथ, निराधार, बेघर अशा बालकांच्या परिपोषणाच्या सव्वाशे कोटींच्या थकीत अनुदानापैकी १४ कोटींच्या अनुदानाचा प्रस्ताव नियोजन विभागाकडे पाठविला असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील सुमारे हजाराहून अधिक बालगृहांचे गेल्या २ वर्षापासूनचे १०८ कोटी व चालू वर्षाचे ८० कोटी रुपयाचे अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बालगृहाचे अनुदान थकितीमुळे कर्जबाजारी झालेल्या दौंड येथील श्रीराम भंडारी यांनी आत्महत्या करण्याची घटना तर कोरडी पाथर्डी येथील बाबुराव रामभाऊ गिरी यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरच्या दुदैवी घटना टाळाव्यात म्हणून शासनाकडे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदींपैकी अखर्चित राहिलेला निधी थकीत अनुदानित बालगृहांना वर्ग करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(६) असल्यास, थकीत अनुदानाच्या या प्रस्तावावर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही,

नियोजन विभाग व वित्त विभागास रु.६९ कोटी रुपयांचा पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्तावावर वित्त विभागाकडे जितक्या बालकांची आधारकार्ड आहेत. त्याप्रमाणात विभागाने अनुदान घ्यावे व उर्वरित अधिक शहानिशा करुन प्रस्ताव द्यावा. असे नमूद केले असून त्याअनुषंगाने अधिकची माहिती मागविण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही,
(४) हे खरे नाही,
(५), (६) व (७) सन २०१४-१५ मधील अन्य लेखाशिर्षाखालील अखर्चित निधी बालगृहाचे परिपोषण अनुदान देणेबाबत पुनर्विनियोजित करण्यासाठी विभागाने एकूण रु. १३.८७ कोटी निधी वळता करण्याबाबत प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे.

-----------------

**मौजे महागाव तालुक्यात (जि.यवतमाळ) ग्रामीण रुग्णालयाच्या**
**निर्मितीला प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत**

**(१०२) * ३८९९ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे महागाव तालुक्यात (जि.यवतमाळ) १५ वर्षापूर्वीच ग्रामीण रुग्णालयाच्या निर्मितीला प्रशासकीय मंजूरी शासनाने दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयांना आजवर निधीच देण्यात आला नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती,
(४) असल्यास, ग्रामीण रुग्णालयांना निधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) शासन निर्णय, दिनांक १७.१.२०१३ अन्वये निर्गमीत करण्यात आलेल्या आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहतआराखड्यानुसार महागाव, जि.यवतमाळ येथे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तर शासन निर्णय, दिनांक २४.६.२०१३ अन्वये रुग्णालयाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून रुग्णालयासाठी जागा उपलब्ध झालेली नसल्यामुळे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये केवळ रुपये १,००० /- इतक्या रकमेची तरतूद या कामाकरीता दर्शविण्यात आलेली आहे.
(४) महागाव, जि.यवतमाळ येथील ग्रामीण रुग्णालयाकरीता जागा उपलब्ध झाल्यावर आवश्यकतेनुसार व एकूण निधीच्या तरतुदीनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------------

## मानोरा तालुक्यात (जि.वाशिम) अतिवृष्टीमुळे सिंचन विहिरी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत

**(१०३) * ३३१० श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा तालुक्यात (जि.वाशिम) सन २०१२-१३ मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे सिंचन विहिरी खचल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खचलेल्या विहीरी यादीमध्ये पक्षपातीपणा करुन अनेक शेतकऱ्यांना डावलण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काली सेवादासनगर, यशवंत नगर, पालोदी उमरी ब्रु, फुलउमरी या गावांच्या एकही लाभार्थ्याचा प्रसिध्दी यादीमध्ये समावेश नसल्याचे आढळले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही, मानोरा तालुक्यात सन २०१२-१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे काही सिंचन विहीरी खचल्या होत्या. त्याबाबत त्या कालावधीत खचलेल्या सिंचन विहिरींची माहिती तहसिलदार, मानोरा कार्यालयामार्फत संकलीत करण्यात आली. त्यानुसार, मानोरा तालुक्यातील ३७ गावातील १०० कास्तकारांच्या सिंचन विहीरी खचलेल्या होत्या. तरी, त्या लाभार्थ्यांची यादी शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१४/प्र.क्र.२५/मग्रारो-१ दि.२३ मे २०१४ नुसार पंचायत समिती, मानोरा कार्यालयास पुरविण्यात आली आहे.

(३) सन २०१२-१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मानोरा तालुक्यातील सर्व गांवनिहाय सर्वेक्षण व पंचनामे तलाठी यांनी करुन, गांवनिहाय लाभार्थी यादी केली आहे. सेवादास नगर मध्ये १ लाभार्थी व पाळोदी मधील २ लाभार्थ्यांची नांवे यादीत समाविष्ट आहेत. तसेच कार्ली, यशवंतनगर, उमरी (खु.), फुलउमरी या गांवाचेही सर्वेक्षण तलाठी यांनी केले असून, या गावांमध्ये अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरी आढळून न आल्याने त्यांचा समावेश यादीमध्ये करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दौंड (जि.पुणे) शहराजवळील वनविभागाच्या हद्दीतील गुप्तेश्वर मंदिर परिसरातून मोठया प्रमाणावर होणारी चंदनाच्या झाडांची चोरी**

**(१०४) * ३१५५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) शहराजवळील वनविभागाच्या हद्दीतील गुप्तेश्वर मंदिर परिसरातून मोठया प्रमाणावर चंदनाच्या झाडांची चोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाच्या नर्सरी व रेस्ट हाऊस नजीक चोरी होत असून याबाबतची माहिती नागरीकांनी वनविभागाला कळवून वनविभाग अधिकारी याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने वन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) पुणे वनविभागांतर्गत दौंड वनपरिक्षेत्रात माहे जानेवारी, २०१५ मध्ये एकाही चंदन झाडाची चोरी झालेली नाही. तथापि, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी मौजे मेरगळवाडी फॉरेस्ट गट नं ४९१ मध्ये ४ लहान चंदन झाडांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर वृक्षतोडीबाबत दि. ४.२.२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला असून तोड झालेला मुद्देमाल जप्त करुन रोपवाटिकेत ठेवण्यात आला आहे. प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. याबाबत क्षेत्रीय कर्मचा-यांनी दुर्लक्ष केल्याचे आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भभवत नाही.

-----------------

**मराठवाडयातील टंचाईग्रस्त भागाकरिता सिंचनाच्या २६ प्रकल्पांना मंजुरी देण्याबाबत**

**(१०५) * २७९३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील टंचाईग्रस्त व आदीवासी भागाकरीता सिंचनाची सोय उपलब्ध करण्याकरीता २६ प्रकल्पांच्या योजनांचे प्रकल्पास मान्यता देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ०५ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मा.राज्यपाल महोदयांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २६ प्रकल्पांना मान्यता देण्याबाबत मा.राज्यपाल महोदयांकडून कोणते आदेश देण्यात आले आहेत,

(३) असल्यास, सदर २६ प्रकल्पांच्या विकास कामांना पुरेसा निधी देऊन किती मुदतीत ही कामे पूर्ण करण्यात येणार आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,
(२) व (३) मा.राज्यपाल यांचेकडून अद्याप मान्यता प्राप्त नाही.

-----------------

**देगलूर (ता.जि.हिंगोली) येथील अंगणवाडयांचे आयएसओ मानांकनाचे उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत**

**(१०६) * ४३७७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (ता.जि.हिंगोली) येथील महिला बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयावर मागील कित्येक दिवसापासून प्रभारी राज असल्यामुळे शंभर टक्के अंगणवाडयांचे आयएसओ मानाकंनाचे उद्दीष्ट पूर्ण होण्याकरिता अनेक अडचणी निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यात २११ मोठया व ४३ मिनी अंगणवाडया कार्यरत असताना आयएसओ साठी फक्त १२ अंगणवाडया तयार असल्याचा प्रस्ताव दाखल असून तेथेही अनेक तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यास बालविकास प्रकल्प कार्यालयास यश आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील १२ पाटबंधारे प्रकल्पांच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१०७) * ५८५२ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोंढाणा, चणेरी, बालगंगा, काळू, शाई, सुसारी, गडनदी, शिळ, जामडा, शिरशिंगे, काळकुंभे आणि गडगडी या १२ पाटबंधारे प्रकल्पांच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या विशेष पथकामार्फत सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोंढाणा आणि चणेरी या दोन पाटबंधारे प्रकल्पाच्या बांधकामाबरोबरच त्यांचा निधीही थांबविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील १२ पाटबंधारे प्रकल्पाची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे मार्फत उघड चौकशी सुरु आहे.
(२) होय, या दोन प्रकल्पातील चणेरी या प्रकल्पाचे नाव चणेरा असे आहे. कोंढाणे व चणेरा या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता शेल्फवर ठेवण्याच्या अटीच्या अधीन राहून देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या बांधकामाकरीता निधी देण्यात आलेला नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचे मार्फत उघड चौकशी सुरु आहे.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई